60
YEARS OF
ENLIGHTENMENT
THROUGH EDUCATION

नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित

# अर्थशास्त्र

# नवनीत

## इयत्ता बारावी

नवनीत मार्गदर्शक म्हणजे → सुनियोजित अभ्यास, उज्ज्वल यश हमखास

NAVNEET®

नवीन पाठ्यपुस्तक आणि नवीन अभ्यासक्रम यांवर आधारित

# अर्थशास्त्र

# नवनीत

## इयत्ता बारावी

- **ठळक वैशिष्ट्ये :**

१. प्रत्येक प्रकरणाची अभ्यास-घटकनिहाय रचना.
२. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला सर्वसमावेशक 'महत्त्वाचे मुद्दे'.
३. पाठ्यपुस्तकामधील स्वाध्यायांतील सर्व प्रश्नांची सुबोध भाषेत अचूक, मुद्देसूद व आदर्श उत्तरे.
४. परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे असे सर्व प्रश्न समर्पक, मुद्देसूद उत्तरांसह समाविष्ट.
५. संपूर्ण, प्रमाणभूत आणि अद्ययावत माहिती.

नवनीत मार्गदर्शक म्हणजे → सुनियोजित अभ्यास, उज्ज्वल यश हमखास!

: लेखक :

श्री. नवनीत

पहिली आवृत्ती : २०२०

Balbharati Registration No. 2018MH0014

E0328

नवनीत एज्युकेशन लिमिटेड

## नवनीत – शैक्षणिक क्षेत्रातील देदीप्यमान यशाची ६० वर्षे!

सन १९५९ मध्ये रुजवलेल्या **नवनीत एज्युकेशन लिमिटेड** या रोपट्याचे आता ६० व्या वर्षी डेरेदार वृक्षात रूपांतर झाले आहे. तब्बल साठ वर्षांच्या या यशस्वी वाटचालीत **नवनीत**ने प्रकाशन आणि स्टेशनरी व्यवसायात भारतातच नव्हे, तर परदेशांतही अढळ स्थान मिळवले आहे. शैक्षणिक पुस्तके, वह्या, स्टेशनरी आणि पुढे जाऊन काळानुरूप ई-लर्निंग क्षेत्रामध्येही नवनीतने चांगलाच जम बसवला आहे. 'शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणारी परिपूर्ण संस्था' हे अभिमानाचे बिरुद मिरवत षष्ट्यब्दीपूर्ती आनंदाने साजरी करताना आम्ही कृतकृत्य आहोत.

असं म्हणतात की, गुणवत्ता हा अपघात नसून ती बुद्धिमान व्यक्तींच्या प्रयत्नांची फलश्रुती असते. नवनीतच्या गुणवत्तेचे श्रेयही निर्विवादपणे नवनीतच्या संस्थापकांचे आहे. त्यांनी दिलेल्या ध्येयधोरणांशी बांधील राहून, त्यांचा वारसा पुढे चालवण्याचे प्रामाणिक प्रयत्न आम्ही करीत आहोत.

सुजाण आणि दक्ष विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, शैक्षणिक संस्था आणि शैक्षणिक साहित्य विक्रेते ही आमची खरी ताकद आहे. त्यांचा गुणवत्तेविषयीचा आग्रही दृष्टिकोन आम्हांला अतिशय मोलाचा वाटतो. त्यांचे सहकार्य आणि सदिच्छा घेऊनच आम्ही यशाचे अधिक उच्चांक प्रस्थापित करू इच्छितो.

'उत्तम गुणवत्तेची खात्री म्हणजे नवनीत,' असा नवनीतचा ठसा उमटवण्यात आमच्या ६० वर्षांच्या या प्रदीर्घ वाटचालीत आमचे सर्व हितचिंतक आणि कर्मचारीवृंद या सर्वांचे योगदान अमूल्य आहे. म्हणूनच आम्ही या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

– नवनीत एज्युकेशन लिमिटेड


**नवनीत एज्युकेशन लिमिटेड**

**मुंबई :** नवनीत भवन, भवानीशंकर रोड, दादर (प.), **मुंबई–४०० ०२८.** (फोन : ६६६२ ६५६५)

www.navneet.com • **e-mail :** publications@navneet.com

**पुणे :** नवनीत भवन, १३०२, शुक्रवार पेठ, बाजीराव रोड, सणस प्लाझाजवळ, **पुणे–४११ ००२.** (फोन : २४४३ १००७)

**नागपूर :** ६३, शिवाजी सायन्स कॉलेजसमोर, काँग्रेसनगर, **नागपूर – ४४० ०१२.** (फोन : २४२ १५२२)

**नाशिक :** निर्माण इन्स्पायर, दुसरा मजला, कान्हेरे वाडी, जुन्या सीबीएसच्या समोर, **नाशिक–४२२ ००१.** (फोन : २५९ ६९५०)



**© All rights reserved. No part of this book may be copied, adapted, abridged or translated, stored in any retrieval system, computer system, photographic or other system or transmitted in any form or by any means without a prior written permission of the copyright holders, M/s. Navneet Education Limited.** ***Any breach will entail legal action and prosecution without further notice.***



**Published by :** Navneet Education Limited, Dantali, Gujarat.
**Printed by :** Navneet Education Limited, Dantali, Gujarat.

2001
CTP
(12-6-2020)

# मनोगत

इयत्ता बारावीचा 'अर्थशास्त्र' या विषयाचा नवीन अभ्यासक्रम आणि नवीन पाठ्यपुस्तक यांवर आधारित **'अर्थशास्त्र नवनीत : इयत्ता बारावी'** ची ही नवीन आवृत्ती प्रकाशित करताना आम्हांला अत्यंत आनंद होत आहे. आहे.

या विषयाचा नवीन अभ्यासक्रम आणि नवीन पाठ्यपुस्तक यांचा सखोल अभ्यास करून हे मार्गदर्शक तयार करण्यात आले आहे. या मार्गदर्शकातील प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला महत्त्वाचे मुद्दे स्पष्टीकरणांसह देण्यात आले आहे. त्यावरून त्या त्या प्रकरणात समाविष्ट असलेल्या पाठ्यवस्तूच्या आशयाचे विद्यार्थ्यांना सहज आकलन होईल. अभ्यासाची उजळणी करण्यासाठी सारांशरूपाने देण्यात आलेले महत्त्वाचे मुद्दे विद्यार्थ्यांना खूपच उपयोगी पडतील.

प्रस्तुत मार्गदर्शकात पाठ्यपुस्तकाच्या स्वाध्यायांतील सर्व प्रश्नांचा अचूक, मुद्देसूद व आदर्श उत्तरांसह समावेश केलेला आहेच; त्याचबरोबर परीक्षेच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेले सर्व प्रकारचे प्रश्नही मुद्देसूद, समर्पक उत्तरांसह समाविष्ट करण्यात आले आहेत.

या मार्गदर्शकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांची **'अर्थशास्त्र'** या विषयाची परिपूर्ण तयारी होईल आणि त्यांना बोर्डाच्या परीक्षेत उज्ज्वल यश मिळेल, असा दृढ विश्वास आम्हांला वाटतो.

या मार्गदर्शकाची उपयुक्तता वाढवण्याच्या दृष्टीने येणाऱ्या सर्व सूचना स्वागतार्ह आहेत.

**– प्रकाशक**

NAVNEET ®

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्राचा परिचय | ... ५ |
| २. | उपयोगिता विश्लेषण | ... १६ |
| ३ अ. | मागणीचे विश्लेषण | ... २७ |
| ३ ब. | मागणीची लवचीकता | ... ३९ |
| ४. | पुरवठा विश्लेषण | ... ५३ |
| ५. | बाजाराचे प्रकार | ... ६७ |
| ६. | निर्देशांक | ... ७८ |
| ७. | राष्ट्रीय उत्पन्न | ... ८९ |
| ८. | भारतातील सार्वजनिक वित्त व्यवहार | ... १०२ |
| ९. | भारतातील नाणे बाजार आणि भांडवल बाजार | ... ११५ |
| १०. | भारताचा विदेशी व्यापार | ... १२९ |


NAVNEET ®

# १ सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्राचा परिचय

**महत्वाच्या संकल्पना :**

**(१) सूक्ष्म अर्थशास्त्र :** अर्थव्यवस्थेतील अत्यंत छोट्या भागाच्या आर्थिक वर्तनाचे विश्लेषण करणारे शास्त्र, म्हणजे 'सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र' होय.

**(२) स्थूल अर्थशास्त्र :** संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणारे शास्त्र, म्हणजे 'स्थूल अर्थशास्त्र' होय.

**(३) सूक्ष्मलक्षी/सूक्ष्म आर्थिक चले :** आर्थिक चलांची सूक्ष्म परिमाणे, म्हणजेच 'सूक्ष्मलक्षी/सूक्ष्म आर्थिक चले' होत.

**(४) समग्रलक्षी/समग्र आर्थिक चले :** आर्थिक चलांचे बेरजेचे रूप किंवा आर्थिक चलांची समुच्चयात्मक परिमाणे, म्हणजेच 'समग्रलक्षी/समग्र आर्थिक चले' होत.

## महत्त्वाचे मुद्दे

### १. प्रस्तावना :

(१) आधुनिक अर्थशास्त्राच्या सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र या दोन मुख्य शाखा आहेत. सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र या शब्दांचा सर्वप्रथम वापर १९३३ मध्ये ओस्लो विद्यापीठात नॉर्वेजियन अर्थशास्त्रज्ञ **रॅगनर फ्रिश** यांनी केला.

(२) सूक्ष्म अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये Microeconomics असे म्हणतात. इंग्रजीतील Micro या शब्दाची उत्पत्ती मूळ ग्रीक शब्द Mikros या शब्दापासून झाली आहे. Mikros या शब्दाचा मराठी अर्थ अत्यंत लहान किंवा एक-दशलक्षांश भाग असा होतो. म्हणजेच सूक्ष्म अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेतील अत्यंत सूक्ष्म घटकांचा अभ्यास करते. सूक्ष्म अर्थशास्त्रास व्यष्टी अर्थशास्त्र किंवा अंशलक्षी अर्थशास्त्र किंवा सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र असेही म्हणतात.

(३) स्थूल अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये Macroeconomics असे म्हणतात. इंग्रजीतील Macro या शब्दाची उत्पत्ती मूळ ग्रीक शब्द Makros या शब्दापासून झाली आहे. Makros या शब्दाचा मराठी अर्थ मोठा किंवा समग्र भाग असा होतो. म्हणजेच स्थूल अर्थशास्त्र हे संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करते.

### २. सूक्ष्म अर्थशास्त्राचा अर्थ आणि व्याख्या :

(१) अर्थव्यवस्थेतील वैयक्तिक उपभोक्ता, वैयक्तिक उत्पादक किंवा उत्पादक संस्था / पेढी यांसारख्या सूक्ष्म घटकांचा अभ्यास करणारे अर्थशास्त्र, म्हणजे 'सूक्ष्म अर्थशास्त्र' होय.

(२) **मॉरिस डॉब** यांच्या मते, "अर्थव्यवस्थेचे सूक्ष्मदर्शी अध्ययन म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र होय."

(३) **ए. पी. लर्नर** यांच्या मते, "सूक्ष्म अर्थशास्त्राद्वारे अर्थव्यवस्थेकडे जणू काही सूक्ष्मदर्शकाद्वारे पाहिले जाते. अर्थव्यवस्थारूपी शरीरातील लाखो पेशी म्हणजे व्यक्ती आणि कुटुंबे उपभोक्त्याच्या रूपाने आणि उत्पादनसंस्था उत्पादकाच्या रूपाने अर्थव्यवस्थेच्या संचलनात कशा प्रकारे भूमिका पार पाडतात, हे अभ्यासण्यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्र या पेशींकडे जणू काही सूक्ष्मदर्शकातून पाहते."

### ३. सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती :

सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती ही प्रामुख्याने किंमत सिद्धांत व साधनसामग्रीचे वाटप यांच्याशी संबंधित आहे. सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट करण्यात आली आहे :

| सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती | स्पष्टीकरण |
|---|---|
| १. वस्तू व सेवा यांच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत | (१) वस्तू व सेवा यांच्या किंमत निश्चितीचे स्पष्टीकरण (२) मागणीच्या विश्लेषणाचा आणि पुरवठ्याच्या विश्लेषणाचा समावेश. |
| २. उत्पादक घटकांच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत | (१) उत्पादक घटकांच्या किंमत/मोबदले निश्चितीचे स्पष्टीकरण (२) खंड, वेतन, व्याज आणि नफा सिद्धांतांचा समावेश. |
| ३. आर्थिक कल्याणाचे सिद्धांत | (१) उत्पादन क्षेत्रातील कार्यक्षमता (२) उपभोगाच्या क्षेत्रातील कार्यक्षमता (३) एकूण आर्थिक कार्यक्षमता या कार्यक्षमतांचा अभ्यास. |

### ४. सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये :

सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट करण्यात आली आहेत :

| सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये |
|---|
| १. विशिष्ट कुटुंब, विशिष्ट उत्पादन संस्था इत्यादी वैयक्तिक आर्थिक घटकांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास. |
| २. वस्तू व सेवा तसेच उत्पादक घटक यांच्या किंमत निर्धारणाचा अभ्यास. किंमत सिद्धांत/मूल्य सिद्धांत म्हणूनही ओळख. |
| ३. इतर परिस्थिती कायम मानून विशिष्ट घटकाच्या आंशिक समतोलावर भर. |
| ४. पूर्ण रोजगार, शुद्ध भांडवलशाही, पूर्ण स्पर्धा, सरकारी निर्हस्तक्षेप, इतर परिस्थिती कायम इत्यादी गृहीतकांवर आधारित. |
| ५. अर्थव्यवस्थेचे लहानात लहान वैयक्तिक आर्थिक घटकांमध्ये विभाजन करून प्रत्येक घटकाचा स्वतंत्रपणे अभ्यास. |
| ६. सूक्ष्म अर्थशास्त्रीय विश्लेषणासाठी सीमांत तत्त्वाचा वापर. |
| ७. पूर्ण स्पर्धा, मक्तेदारी, अल्पाधिकार, मक्तेदारीयुक्त स्पर्धा इत्यादी बाजार रचनांचा अभ्यास. |
| ८. राष्ट्रीय समस्यांचा आणि समग्र घटकांचा अभ्यास होत नसल्याने मर्यादित व्याप्ती. |

## ५. सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व :

सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे :

| सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व |
|---|
| १. वस्तू व सेवा तसेच उत्पादन घटक यांच्या किमती कशा निर्धारित होतात, त्याचे स्पष्टीकरण देण्यासाठी उपयुक्त. |
| २. मुक्त बाजारपेठीय अर्थव्यवस्थेची कार्यपद्धती समजून घेण्यास उपयुक्त. |
| ३. विनिमय दर, जकात दर इत्यादी विदेशी/आंतरराष्ट्रीय व्यापरविषयक बाबींचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त. |
| ४. अर्थव्यवस्थेतील गुंतागुंतीची परिस्थिती स्पष्ट करणाऱ्या आर्थिक प्रारूपांच्या निर्मितीत उपयुक्त. |
| ५. उद्योजकांना किंमत, उत्पादन खर्च, उत्पादकता इत्यादींसंबंधी अचूक व्यावसायिक निर्णय घेण्यास उपयुक्त. |
| ६. आर्थिक धोरणे आखण्यासाठी आणि संसाधनांच्या कार्यक्षम वितरणासाठी शासनास उपयुक्त. |
| ७. कल्याणकारी अर्थशास्त्राचा पाया म्हणून उपयुक्त. |

## ६. स्थूल अर्थशास्त्राचा अर्थ व व्याख्या :

(१) स्थूल अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित अशा समग्र घटकांचा अभ्यास केला जातो. या शाखेत एकूण रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय उत्पादन, समग्र मागणी, समग्र पुरवठा, एकूण उपभोग व एकूण बचत, एकूण गुंतवणूक अशा मोठ्या, समग्र घटकांचा अभ्यास संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या संदर्भात केला जातो. स्थूल (समग्रलक्षी) अर्थशास्त्राचे स्वरूप समुच्चयात्मक (Aggregative) आहे.

(२) **प्रा. जे. एल. हॅन्सन** यांच्या मते, ''स्थूल अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अशी शाखा आहे की ज्यात एकूण रोजगार, एकूण बचत, एकूण गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्न यांसारख्या मोठ्या समुच्चयाचा व त्यांच्यातील परस्परसंबंधांचा विचार करण्यात येतो.''

(३) **प्रा. कार्ल शॅपिरो** यांच्या मते, ''स्थूल अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेच्या संपूर्ण कार्यपद्धतीशी संबंधित आहे.''

## ७. स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती :

स्थूल अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील समग्र घटकांचा अभ्यास केला जातो. स्थूल अर्थशास्त्राच्या व्याप्तीत समाविष्ट होणाऱ्या चार सिद्धांताचे पुढील तक्त्यात स्पष्टीकरण करण्यात आले आहे :

| स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती | स्पष्टीकरण |
|---|---|
| १. उत्पन्न व रोजगार सिद्धांत | (१) राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार यांची पातळी कशी ठरते, कोणत्या कारणांमुळे त्यांत बदल होतात व त्यावरील उपाययोजना यांचे विवेचन. (२) उपभोग फलन आणि बचत फलन यांचा अभ्यास. |
| २. सर्वसाधारण किंमत पातळीचे सिद्धांत | किंमत पातळी कशी ठरते, कोणत्या कारणांमुळे तिच्यात बदल होतात व त्यावरील उपाययोजना यांचे विवेचन. |
| ३. आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धांत | (१) अविकसित व विकसनशील देशांतील दारिद्र्य व अल्पविकास यांच्या कारणांचा अभ्यास व या देशांत आर्थिक वृद्धी व विकास कसा घडवून आणता येईल याचे स्पष्टीकरण देणाऱ्या सिद्धांतांचा अभ्यास. (२) विकसित देशांमध्ये स्थैर्यासह आर्थिक वृद्धीचा वाढता दर कसा गाठता येईल याचे विवेचन. |
| ४. विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धांत | एकूण राष्ट्रीय उत्पन्नात खंड, वेतन, व्याज व नफा यांचा सापेक्ष वाटा कसा ठरतो याचे स्पष्टीकरण करणारे सिद्धांत. |

NAVNEET ®

## ८. स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये :

स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये पुढील तक्त्यात स्पष्ट केली आहेत :

| स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये |
|---|
| १. संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील समग्र घटकांचा अभ्यास. |
| २. उत्पन्न व रोजगार सिद्धांत किंवा उत्पन्न विश्लेषण म्हणून ओळख, उत्पन्न व रोजगार पातळी कशी निश्चित होते, त्यांत कोणत्या कारणांनी चढउतार होतात व त्यांवरील उपाय यांचे विवेचन. |
| ३. संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या समतोलाचे विश्लेषण. आर्थिक घटकांमधील फलनात्मक संबंध व परस्परावलंबन यांचा विचार. |
| ४. आर्थिक चलांमधील परस्परावलंबनाचा विचार व विवेचन. |
| ५. समग्र चलांच्या अभ्यासासाठी राशी पद्धतीचा अवलंब. |
| ६. आर्थिक वृद्धी व आर्थिक विकास यांच्या प्रारूपांचा विचार. |
| ७. सर्वसाधारण किंमत पातळी कशी निश्चित होते, तिच्यात चढउतार कोणत्या कारणांनी होतात व त्यांवरील उपाय यांचे विवेचन. |
| ८. भाववाढ रोखणे, राजगार निर्माण करणे, अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढणे, देशाचा आर्थिक विकास जलद गतीने साधणे यांसाठी आर्थिक धोरणे ठरवण्यास उपयुक्त. |

## ९. स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व :

स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे :

| स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व |
|---|
| १. अर्थव्यवस्थेतील एकूण चलांचे आर्थिक वर्तन समजून घेण्यास साहाय्यभूत. |
| २. राष्ट्रीय उत्पन्नातील चढउतार, उत्पादन व रोजगार पातळीतील चढउतार यांची कारणे व त्यांवरील नियंत्रण यांच्या विवेचनास उपयुक्त. |
| ३. राष्ट्रीय उत्पन्न आणि सामाजिक लेखा यांच्या अभ्यासास उपयुक्त. |
| ४. अविकसित आणि विकसनशील देशांतील आर्थिक व सामाजिक समस्यांची कारणे व उपाय यांच्या अभ्यासास उपयुक्त. |
| ५. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीच्या साहाय्याने अर्थव्यवस्थेच्या कामगिरीच्या मापनास साहाय्यभूत. |
| ६. आर्थिक चलांद्वारे अर्थव्यवस्थेच्या कामगिरीच्या विश्लेषणास उपयुक्त. |
| ७. सामान्य रोजगार पातळी आणि एकूण उत्पादन यांचे विश्लेषण करण्यास उपयुक्त. |

## १०. सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र यांचा तौलनिक अभ्यास :

| तुलनेसाठी आधार | सूक्ष्म अर्थशास्त्र | स्थूल अर्थशास्त्र |
|---|---|---|
| **१. अर्थ** | अर्थव्यवस्थेतील वैयक्तिक घटकांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र. | अर्थव्यवस्थेतील एकूण घटकांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र. |
| **२. अभ्यासविषय** | वैयक्तिक मागणी, वैयक्तिक पुरवठा, वैयक्तिक उत्पन्न इत्यादी बाबींचा अभ्यास. | समग्र मागणी, समग्र पुरवठा, राष्ट्रीय उत्पन्न इत्यादी बाबींचा अभ्यास. |
| **३. व्याप्ती/सिद्धांत** | **सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती**<br>→ वस्तूंच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत<br>  → मागणीचे विश्लेषण<br>  → पुरवठ्याचे विश्लेषण<br>→ उत्पादन घटकांच्या किमती निश्चितीचे सिद्धांत<br>  → खंड<br>  → वेतन<br>  → व्याज<br>  → नफा<br>→ आर्थिक कल्याणाचे सिद्धांत<br>  → उत्पादन क्षेत्रातील कार्यक्षमता<br>  → उपभोग क्षेत्रातील कार्यक्षमता<br>  → एकूण आर्थिक कार्यक्षमता | **स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती**<br>→ उत्पन्न व रोजगार सिद्धांत<br>  → उपभोग फलनाचा सिद्धांत<br>  → गुंतवणक सिद्धांत<br>    → व्यापारचक्राचे सिद्धांत<br>→ सर्वसाधारण किंमत सिद्धांत व भाववाढ<br>→ आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धांत<br>→ विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धांत |

NAVNEET®

| | | |
|---|---|---|
| ४. महत्त्व | किंमत निर्धारण, आर्थिक प्रारूपांची निर्मिती, व्यावसायिक निर्णय, साधनसामग्रीचे वाटप इत्यादी बाबतींत उपयुक्त. | आर्थिक चढउतारांचे विश्लेषण, राष्ट्रीय उत्पन्नाचे विश्लेषण, आर्थिक विकासाचे विश्लेषण, सामान्य रोजगार पातळीचे विश्लेषण इत्यादी बाबतींत उपयुक्त. |

## प्रश्नोत्तरे

### प्र. १ योग्य पर्याय निवडा : *(प्रत्येकी १ गुण)*

*(१) अर्थशास्त्राची शाखा, जी संसाधन वाटपाशी संबंधित आहे.
*(अ) सूक्ष्म अर्थशास्त्र* *(ब) स्थूल अर्थशास्त्र*
*(क) अर्थमिती* *(ड) यांपैकी काहीही नाही*
**पर्याय :** (१) अ, ब, क (२) अ, ब
(३) फक्त अ (४) वरीलपैकी नाही

*(२) सूक्ष्म अर्थशास्त्रातील संकल्पना
*(अ) राष्ट्रीय उत्पन्न* *(ब) सामान्य किंमत पातळी*
*(क) घटक किंमत* *(ड) उत्पादन किंमत*
**पर्याय :** (१) ब, क (२) ब, क, ड
(३) अ, ब, क (४) क, ड

*(३) सूक्ष्म अर्थशास्त्रीय विश्लेषणात वापरली जाणारी पद्धत.
*(अ) राशी पद्धत* *(ब) समग्र पद्धत*
*(क) विभाजन पद्धत* *(ड) सर्वसमावेशक पद्धत*
**पर्याय :** (१) अ, क, ड (२) ब, क, ड
(३) फक्त क (४) फक्त अ

*(४) स्थूल अर्थशास्त्र पुढील संकल्पनांचा अभ्यास करते.
*(अ) संपूर्ण अर्थव्यवस्था* *(ब) आर्थिक विकास*
*(क) एकूण पुरवठा* *(ड) उत्पादन किंमत*
**पर्याय :** (१) अ, ब, क (२) ब, क, ड
(३) फक्त ड (४) अ, ब, क, ड

(५) स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती
*(अ) उपभोग फलन* *(ब) गुंतवणूक फलन*
*(क) वैयक्तिक मागणी* *(ड) रोजगार पातळी*
**पर्याय :** (१) अ, ब, ड (२) ब, क, ड
(३) फक्त ड (४) फक्त क

**उत्तरे :** **(१)** (३) फक्त अ.
**(२)** (४) क, ड.
**(३)** (३) फक्त क.
**(४)** (१) अ, ब, क.
**(५)** (१) अ, ब, ड.

### प्र. २ विसंगत शब्द ओळखा : *(प्रत्येकी १ गुण)*

(१) वैयक्तिक मागणी, वैयक्तिक पुरवठा, वैयक्तिक उत्पन्न, किंमत पातळी.
(२) किंमत पातळी, रोजगार पातळी, खंड निश्चिती, राष्ट्रीय उत्पन्न.
(३) वस्तूंच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत, आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धांत, उत्पादन घटकांच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत, आर्थिक कल्याणाचे सिद्धांत.
(४) आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धांत, उत्पन्न व रोजगार सिद्धांत, विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धांत, आर्थिक कल्याणाचे सिद्धांत.
(५) नफा, भूमी, श्रम, भांडवल.

**उत्तरे :** (१) किंमत पातळी (२) खंड निश्चिती (३) आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धांत (४) आर्थिक कल्याणाचे सिद्धांत (५) नफा.

### *प्र. ३ सहसंबंध पूर्ण करा : *(प्रत्येकी १ गुण)*

(१) सूक्ष्म अर्थशास्त्र : विभाजन पद्धत : :
स्थूल अर्थशास्त्र : ______.
(२) सूक्ष्म अर्थशास्त्र : झाड : :
स्थूल अर्थशास्त्र : ______.
(३) स्थूल अर्थशास्त्र : उत्पन्न आणि रोजगार सिद्धांत : :
सूक्ष्म अर्थशास्त्र : ______.
(४) मॅक्रोस : स्थूल अर्थशास्त्र : :
मायक्रोस : ______.
(५) सर्वसाधारण समतोल : स्थूल अर्थशास्त्र : :
______ : सूक्ष्म अर्थशास्त्र.

**उत्तरे :** (१) राशी पद्धत (२) जंगल (३) वस्तू व सेवा यांच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत/उत्पादन घटकांच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत/आर्थिक कल्याणाचे सिद्धांत (४) सूक्ष्म अर्थशास्त्र (५) आंशिक समतोल.

### प्र. ४ योग्य अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सुचवा : *(प्रत्येकी १ गुण)*

(१) संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या समतोलाचे/संतुलनाचे विवेचन करणारा समतोलाचा/संतुलनाचा प्रकार.
(२) आर्थिक चलांचे समुच्चयात्मक परिमाण.
(३) विशिष्ट घटकाच्या समतोलाचे/संतुलनाचे विवेचन करणारा समतोलाचा/संतुलनाचा प्रकार.

(**सूचना :** पाठ्यपुस्तकातील प्रश्न * या चिन्हाद्वारे दर्शवण्यात आले आहेत.)

(४) आर्थिक चलांचे सूक्ष्म परिमाण.

(५) भांडवलाचा मोबदला.

**उत्तरे :** (१) समग्र समतोल/संतुलन (२) समग्रलक्षी/समग्र आर्थिक चले (३) आंशिक समतोल/संतुलन (४) सूक्ष्मलक्षी/सूक्ष्म आर्थिक चले (५) व्याज.

**प्र. ५ विधाने आणि तर्क प्रश्न – पुढील पर्यायांमधील योग्य पर्याय निवडा :** ***(प्रत्येकी १ गुण)***

**(१) विधान (अ) :** सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती तुलनेने मर्यादित आहे.

**तर्क विधान (ब) :** सूक्ष्म अर्थशास्त्रात केवळ वैयक्तिक आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो.

**पर्याय :**

(१) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

(२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

(३) दोन्ही विधाने सत्य असून, 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.

(४) दोन्ही विधाने सत्य असून, 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**उत्तर :** (३) दोन्ही विधाने सत्य असून, 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.

---

**(२) विधान (अ) :** स्थूल अर्थशास्त्र उत्पन्न विश्लेषण म्हणून ओळखले जाते.

**तर्क विधान (ब) :** स्थूल अर्थशास्त्रात विशिष्ट व्यक्तीने किंवा विशिष्ट उत्पादन संस्थेने प्राप्त केलेल्या उत्पन्नाचा अभ्यास केला जातो.

**पर्याय :**

(१) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

(२) विधान 'अ' असत्य आहे, पण तर्क विधान 'ब' सत्य आहे.

(३) दोन्ही विधाने सत्य असून, 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.

(४) दोन्ही विधाने सत्य असून, 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**उत्तर :** (१) विधान 'अ' सत्य आहे, पण तर्क विधान 'ब' असत्य आहे.

**प्र. ६ पुढील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :** ***(प्रत्येकी २ गुण)***

***(१) गौरीने एका विशिष्ट उद्योगातील वैयक्तिक उत्पन्नाची माहिती गोळा केली.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** वैयक्तिक घटक अभ्यास.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** अर्थव्यवस्थेतील एखाद्या विशिष्ट घटकाचा स्वतंत्रपणे केलेला अभ्यास म्हणजे वैयक्तिक घटक अभ्यास होय. **उदा.,** सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट उद्योगाचा, वैयक्तिक उत्पन्नाचा केलेला अभ्यास.

***(२) रमेशने उत्पादनविषयक सर्व निर्णय स्वत: घेण्याचे ठरवले. उदा., काय आणि कसे उत्पादन करावे ?**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** मुक्त बाजार अर्थव्यवस्थेतील व्यावसायिक निर्णय.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** मुक्त बाजार अर्थव्यवस्थेत उत्पादकाला किंवा व्यावसायिकाला उत्पादन क्षेत्रातील कार्यक्षमतेसाठी काही निर्णय घ्यावे लागतात. हे निर्णय म्हणजेच मुक्त बाजार अर्थव्यवस्थेतील व्यावसायिक निर्णय होत. व्यावसायिकाला किंमत, उत्पादनखर्च इत्यादींसंबंधीही व्यावसायिक निर्णय घ्यावे लागतात. या व्यावसायिक निर्णयांत शासन किंवा इतर कोणत्या यंत्रणेचा हस्तक्षेप नसतो.

***(३) शबानाने आपल्या कारखान्यातील कामगारांना वेतन आणि बँक कर्जावरील व्याज दिले.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** उत्पादन घटकांचे मोबदले देणे.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** वस्तूंच्या उत्पादनासाठी भूमी, श्रम, भांडवल व संयोजक हे उत्पादन घटक आवश्यक असतात. या उत्पादन घटकांना उत्पादन प्रक्रियेत सहभागी झाल्याबद्दल उत्पादकाकडून अनुक्रमे खंड, वेतन, व्याज व नफा हे मोबदले प्राप्त होतात.

**(४) राजेशने त्याला एक महिन्याच्या कालावधीत किती वेळा रिक्षाने प्रवास करावा लागतो हे मोजण्याचे ठरवले.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** वैयक्तिक मागणीचा अभ्यास.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** एका विशिष्ट कालावधीत विशिष्ट किमतीला एका व्यक्तीने (ग्राहकाने) केलेली वस्तूची किंवा सेवेची मागणी म्हणजे वैयक्तिक मागणी होय. वैयक्तिक मागणीचा सूक्ष्म अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो.

**प्र. ७ फरक स्पष्ट करा :** ***(प्रत्येकी २ गुण)***

**(१) सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र :**

| सूक्ष्म अर्थशास्त्र | स्थूल अर्थशास्त्र |
|---|---|
| **१. अर्थ** | |
| मॉरिस डॉब यांच्या मते, "अर्थव्यवस्थेचे सूक्ष्मदर्शी अध्ययन म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र होय." | कार्ल शॅपिरो यांच्या मते, "स्थूल अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेच्या संपूर्ण कार्यपद्धतीशी संबंधित आहे." |

| | |
|---|---|
| **२. व्याप्ती** | |
| सूक्ष्म अर्थशास्त्राच्या व्याप्तीत वस्तूंच्या व सेवांच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत, उत्पादन घटकांच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत आणि आर्थिक कल्याणाचे सिद्धांत यांचा समावेश होतो. | स्थूल अर्थशास्त्राच्या व्याप्तीत उत्पन्न व रोजगार सिद्धांत, सर्वसाधारण किंमत सिद्धांत, आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धांत आणि विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धांत यांचा समावेश होतो. |

**(२) विभाजन पद्धत आणि राशी पद्धत :**

| विभाजन पद्धत | राशी पद्धत |
|---|---|
| **१. अर्थ** | |
| संपूर्ण अर्थव्यवस्थेचे लहानात लहान आर्थिक घटकांमध्ये विभाजन करून त्यांचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्राद्वारे वापरली जाणारी पद्धत म्हणजे विभाजन पद्धत होय. | संपूर्ण अर्थव्यवस्थेतील लहानात लहान आर्थिक घटकांच्या बेरजेच्या स्वरूपातील एकूण परिमाणाचा अभ्यास करण्यासाठी स्थूल अर्थशास्त्राद्वारे वापरली जाणारी पद्धत म्हणजे राशी पद्धत होय. |
| **२. स्वरूप** | |
| आर्थिक चलांच्या व्यक्तिगत परिमाणांच्या अभ्यासासाठी विभाजन पद्धतीचा वापर केला जातो. | आर्थिक चलांच्या समुच्चयात्मक परिमाणांच्या अभ्यासासाठी राशी पद्धतीचा वापर केला जातो. |

**(३) आंशिक समतोल आणि सर्वसाधारण समतोल :**

| आंशिक समतोल | सर्वसाधारण समतोल |
|---|---|
| **१. अर्थ** | |
| सूक्ष्म अर्थशास्त्रात अर्थव्यवस्थेतील विशिष्ट घटकाचा समतोल स्पष्ट करणारा समतोलाचा प्रकार म्हणजे आंशिक समतोल होय. | स्थूल अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेचा समतोल स्पष्ट करणारा समतोलाचा प्रकार म्हणजे सर्वसाधारण समतोल होय. |
| **२. स्वरूप** | |
| आंशिक समतोलात इतर परिस्थिती कायम असल्याचे गृहीत मानून आर्थिक चलांमध्ये परस्परावलंबन नसल्याचे गृहीत धरले जाते. | सर्वसाधारण समतोलात सर्व घटक इतर सर्व घटकांशी संबंधित असल्याचे गृहीत मानून आर्थिक चलांमध्ये परस्परावलंबन असल्याचे गृहीत धरले जाते. |

## प्र. ८ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : *(प्रत्येकी ४ गुण)*

***(१) सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर :** *यासाठी प्र. १० मधील (१) चे उत्तर पाहा.*

(**नोंद :** उत्तरात कोणतेही चार मुद्दे अपेक्षित.)

***(२) स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर :** *यासाठी प्र. १० मधील (५) चे उत्तर पाहा.*

(**नोंद :** उत्तरात कोणतेही चार मुद्दे अपेक्षित.)

***(३) स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.**

**उत्तर :** स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे :

**(१) उत्पन्न व रोजगार सिद्धांत :** स्थूल अर्थशास्त्रात राष्ट्रीय उत्पन्नाची व रोजगाराची पातळी कशी ठरते आणि या घटकांमध्ये कोणत्या कारणांमुळे व कसा बदल घडून येतो यांचे विवेचन केले जाते. राष्ट्रीय उत्पन्न व रोजगार पातळी कशी ठरते हे समजून घेण्यासाठी उपभोग फलन, गुंतवणूक फलन आणि व्यापारचक्राचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात केला जातो. समग्रलक्षी अर्थशास्त्रात उत्पादन, उत्पन्न व रोजगार पातळी यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास केला जातो व या समग्रलक्षी आर्थिक चलांशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी धोरणे सुचवली जातात.

**(२) सर्वसाधारण किंमत पातळीचे सिद्धांत :** सर्वसाधारण किंमत पातळी कशी ठरते व त्यामध्ये कोणत्या कारणांनी चढउतार होतात, यांचे विवेचन स्थूल अर्थशास्त्रात केले जाते. स्थूल अर्थशास्त्रात भाववाढ व आर्थिक मंदीची कारणे व परिणाम यांचे विश्लेषण करून त्यावर मात करण्यासाठी योग्य आर्थिक धोरणांची चर्चा केली जाते.

**(३) आर्थिक वृद्धी व विकासाचे सिद्धांत :** अविकसित व विकसनशील देशांतील दारिद्र्य व अल्पविकास यांच्या कारणांचा अभ्यास करून या देशांमध्ये राष्ट्रीय उत्पादनात वाढ कशी घडवून आणता येईल, याचे स्पष्टीकरण करणारी प्रारूपे व सिद्धांत स्थूल अर्थशास्त्रात विकसित करण्यात आले आहेत. स्थैर्यासह आर्थिक वृद्धीचा वाढता दर याचेही विवेचन स्थूल अर्थशास्त्रात होते.

**(४) विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धांत :** राष्ट्रीय उत्पन्नात समाजातील विविध गटांचा सापेक्ष वाटा कसा ठरतो याचे स्पष्टीकरण समग्र अर्थशास्त्राद्वारे केले जाते. एकूण राष्ट्रीय उत्पादनातील खंड, वेतन, व्याज व नफा यांच्या सापेक्ष वाट्याचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात होतो.

**(४) सूक्ष्म अर्थशास्त्राची ऐतिहासिक वाटचाल सांगा.**

**उत्तर :** सूक्ष्म अर्थशास्त्राची ऐतिहासिक वाटचाल पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते :

(१) सूक्ष्मलक्षी दृष्टिकोन हा तुलनेने रूढ किंवा पारंपरिक आहे. या विश्लेषण पद्धतीचा प्रारंभ सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या कालखंडात झालेला दिसतो.

(२) अर्थशास्त्राचे जनक **ॲडम स्मिथ** यांनी त्यांच्या **'राष्ट्राची संपत्ती'** या पुस्तकातून सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्राचा पाया घातला.

(३) **डेव्हिड रिकार्डो** आणि **जे. एस. मिल** यांच्या आर्थिक विवेचनातही सूक्ष्मलक्षी दृष्टिकोन आढळून येतो.

(४) **डॉ. आल्फ्रेड मार्शल** यांना खऱ्या अर्थाने सूक्ष्मलक्षी आर्थिक विश्लेषणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. डॉ. मार्शल यांनी त्यांच्या **'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे'** या ग्रंथातून सीमांत तत्त्व व सूक्ष्मलक्षी आर्थिक विश्लेषणास सर्वोच्च स्थान दिले.

(५) **प्रा. पिगू, जे. आर. हिक्स, प्रा. सॅम्युल्सन, श्रीमती जोन रॉबिन्सन, चेंबरलीन** इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

**प्र. ❾ पुढील विधानांशी आपण सहमत किंवा असहमत आहात ते सकारण स्पष्ट करा :** ***(प्रत्येकी ४ गुण)***

***(१) सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती अमर्याद आहे.**

**उत्तर :** या विधानाशी मी **असहमत** आहे.

**कारणे :** (१) सूक्ष्म अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये Microeconomics असे म्हणतात. इंग्रजीतील Micro या शब्दाची उत्पत्ती मूळ ग्रीक शब्द Mikros या शब्दापासून झाली आहे. Mikros या शब्दाचा मराठी अर्थ अत्यंत लहान किंवा एक-दशलक्षांश भाग असा होतो. म्हणजेच सूक्ष्म अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेतील अत्यंत सूक्ष्म घटकांचा अभ्यास करते.

(२) सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट कुटुंब, विशिष्ट उत्पादन संस्था, वैयक्तिक मागणी, वैयक्तिक पुरवठा, वैयक्तिक उत्पन्न, विशिष्ट वस्तूंची किंमत इत्यादींचा अभ्यास केला जातो.

(३) सूक्ष्म अर्थशास्त्रात एखादा उपभोक्ता महत्तम समाधान कशा प्रकारे प्राप्त करतो व एखादा उत्पादक किंवा उत्पादनसंस्था/पेढी महत्तम नफा कशा प्रकारे प्राप्त करते याचा अभ्यास केला जातो. सूक्ष्म अर्थशास्त्रात समग्र घटकांचा अभ्यास केला जात नाही. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्र हे समुच्चयात्मक स्वरूपाचे नसून व्यक्तिगत स्वरूपाचे असते.

म्हणून सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती अमर्याद नसून मर्यादित आहे.

***(२) स्थूल अर्थशास्त्रात वैयक्तिक वर्तनाचा अभ्यास केला जातो.**

**उत्तर :** या विधानाशी मी **असहमत** आहे.

**कारणे :** (१) स्थूल अर्थशास्त्रात विशिष्ट ग्राहक, वैयक्तिक मागणी, विशिष्ट विक्रेता, वैयक्तिक पुरवठा, विशिष्ट वस्तूच्या किमतीचे निर्धारण इत्यादी वैयक्तिक घटकांचा अभ्यास केला जात नाही.

(२) सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक घटकांचा अभ्यास केला जातो. सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट ग्राहकाच्या महत्तम उपयोगिता प्राप्तीचे आणि विशिष्ट उत्पादकाच्या महत्तम नफा प्राप्तीचे विश्लेषण केले जाते.

(३) परंतु स्थूल अर्थशास्त्रात समग्र आर्थिक चलांचा, त्यांच्यातील फलनात्मक संबंधाचा व परस्परावलंबनाचा तसेच त्यांच्या निर्धारणाचा, त्यांच्यातील बदलांचा व चढउतारांच्या कारणांचा अभ्यास केला जातो.

म्हणून स्थूल अर्थशास्त्रात वैयक्तिक वर्तनाचा अभ्यास केला जात नाही, तर समग्र घटकांच्या वर्तनाचा अभ्यास केला जातो.

***(३) स्थूल अर्थशास्त्र हे सूक्ष्म अर्थशास्त्रापेक्षा वेगळे आहे.**

**उत्तर :** या विधानाशी मी **सहमत** आहे.

**कारणे :** (१) स्थूल अर्थशास्त्र हे संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणारे अर्थशास्त्र आहे. सूक्ष्म अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेतील विशिष्ट घटकांचा अभ्यास करणारे अर्थशास्त्र आहे.

(२) स्थूल अर्थशास्त्रात समग्र मागणी, समग्र पुरवठा, राष्ट्रीय उत्पन्न, सर्वसाधारण किंमत पातळी इत्यादी समग्र आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो. सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक मागणी, वैयक्तिक पुरवठा, वैयक्तिक उत्पन्न इत्यादी वैयक्तिक आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो.

(३) स्थूल अर्थशास्त्र सर्वसाधारण समतोलावर भर देते. सूक्ष्म अर्थशास्त्र आंशिक समतोलावर भर देते.

(४) स्थूल अर्थशास्त्र राशी किंवा एकत्रीकरण पद्धतीचा वापर करते. सूक्ष्म अर्थशास्त्र विभाजन पद्धतीचा वापर करते.

म्हणून स्थूल अर्थशास्त्र हे सूक्ष्म अर्थशास्त्रापेक्षा वेगळे आहे.

***(४) सूक्ष्म अर्थशास्त्रात विभाजन पद्धतीचा वापर केला जातो.**

**उत्तर :** या विधानाशी मी **सहमत** आहे.

**कारणे :** (१) सूक्ष्म अर्थशास्त्रात अर्थव्यवस्थेतील वैयक्तिक आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो. **उदा.,** विशिष्ट पेढीचा अभ्यास.

(२) वैयक्तिक आर्थिक घटकांच्या अभ्यासासाठी सूक्ष्म अर्थशास्त्रात अर्थव्यवस्थेचे लहानात लहान वैयक्तिक आर्थिक घटकांमध्ये विभाजन केले जाते.

(३) विभाजनानंतर प्रत्येक विशिष्ट घटकाचा स्वतंत्रपणे तपशीलवार अभ्यास केला जातो.

म्हणून सूक्ष्म अर्थशास्त्रात विभाजन पद्धतीचा वापर केला जातो.

***(५) सूक्ष्म अर्थशास्त्र हे उत्पन्न सिद्धांत म्हणून ओळखले जाते.**

**उत्तर :** या विधानाशी मी **असहमत** आहे.

**कारणे :** (१) उत्पन्न सिद्धांताचा समावेश सूक्ष्म अर्थशास्त्रात न होता स्थूल अर्थशास्त्रात होतो.

(२) वस्तूंच्या व सेवांच्या किमती या त्यांच्या मागणीच्या व पुरवठ्याच्या समतोलातून कशा प्रकारे ठरतात याचा सूक्ष्म अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो.

(३) भूमी, श्रम, भांडवल व संयोजक या चार उत्पादन घटकांच्या किमती (मोबदले) म्हणजेच अनुक्रमे खंड, वेतन, व्याज व नफा हे

त्यांच्या मागणीच्या व पुरवठ्याच्या समतोलातून कशा प्रकारे ठरतात, याचाही सूक्ष्म अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो.

म्हणून सूक्ष्म अर्थशास्त्र हे उत्पन्न सिद्धांत म्हणून ओळखले न जाता किंमत सिद्धांत किंवा मूल्य सिद्धांत म्हणून ओळखले जाते.

**(६) स्थूल अर्थशास्त्रात आंशिक समतोलाचे विश्लेषण केले जाते.**

**उत्तर :** या विधानाशी मी **असहमत** आहे.

**कारणे :** (१) स्थूल अर्थशास्त्र समतोलाच्या संदर्भात संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करते. त्यामुळे स्थूल अर्थशास्त्र हे सर्वसाधारण समतोलाच्या विश्लेषणाशी संबंधित आहे.

(२) स्थूल अर्थशास्त्र एकाच वेळेस अनेक समग्रलक्षी आर्थिक चले, त्यांचे आंतरसंबंध, परस्परावलंबन इत्यादींचा अभ्यास करते.

(३) स्थूल अर्थशास्त्र हे सर्व घटक इतर सर्वांशी संबंधित असतात या गृहीतकाचा वापर करते. **उदा.,** स्थूल अर्थशास्त्र हे एकूण मागणी व एकूण पुरवठा यांतील समतोल हा केवळ सर्वसाधारण किंमत पातळी निश्चित करीत नाही, तर त्याच वेळी एकूण उत्पन्न पातळी व एकूण रोजगार पातळीही कशी निश्चित करतो याचे स्पष्टीकरण करते.

म्हणून स्थूल अर्थशास्त्रात आंशिक समतोलाचे विश्लेषण केले जात नाही, तर समग्र समतोलाचे विश्लेषण केले जाते.

**प्र. १० पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : *(प्रत्येकी ८ गुण)***

**(१) सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये सांगा.**

**उत्तर :** सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) वैयक्तिक आर्थिक घटकांचा अभ्यास :** सूक्ष्म अर्थशास्त्रात अर्थव्यवस्थेतील विशिष्ट घटकांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. **उदा.,** सूक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट कुटुंब, विशिष्ट उत्पादन संस्था/पेढी, विशिष्ट वस्तूंची किंमत इत्यादींचा अभ्यास केला जातो.

**(२) किंमत सिद्धांत म्हणून ओळख :** सूक्ष्म अर्थशास्त्रात वस्तू आणि सेवांच्या तसेच भूमी, श्रम, भांडवल व संयोजक या उत्पादन घटकांच्या किमती कशा निश्चित होतात, याचा अभ्यास केला जातो. म्हणूनच सूक्ष्म अर्थशास्त्राला किंमत सिद्धांत किंवा मूल्य सिद्धांत असेही म्हटले जाते.

**(३) आंशिक समतोलावर भर :** सूक्ष्म अर्थशास्त्रात एक उपभोक्ता किंवा एक उत्पादन संस्था इत्यादी वैयक्तिक आर्थिक घटकांना इतर आर्थिक घटकांपासून बाजूला काढून त्यांच्या समतोलाचे स्वतंत्रपणे विश्लेषण केले जाते. म्हणजेच सूक्ष्म अर्थशास्त्रीय विश्लेषण हे आंशिक समतोलाचे विश्लेषण असते. आंशिक समतोल विश्लेषणात 'इतर परिस्थिती कायम असताना' या मूलभूत गृहीतकाचा आधार घेऊन विवेचनाची सुरुवात केली जाते.

**(४) विशिष्ट गृहीतकांवर आधारित :** सूक्ष्म अर्थशास्त्रीय विश्लेषण हे पूर्ण रोजगार, शुद्ध भांडवलशाही, पूर्ण स्पर्धा, सरकारचे निर्हस्तक्षेपाचे धोरण इत्यादी गृहीतकांवर आधारित असते. परंतु वास्तवात अशी परिस्थिती आढळत नाही. सूक्ष्म अर्थशास्त्रातील बहुतांश सिद्धांत हे 'इतर परिस्थिती कायम असताना' या गृहीतकावर आधारित आहेत.

**(५) विभाजन पद्धतीचा वापर :** सूक्ष्म अर्थशास्त्रात अर्थव्यवस्थेचे लहानात लहान वैयक्तिक आर्थिक घटकांमध्ये विभाजन केले जाते व त्यानंतर प्रत्येक विशिष्ट घटकाचा स्वतंत्रपणे, तपशीलवार अभ्यास केला जातो. म्हणजेच सूक्ष्म अर्थशास्त्रात विभाजन पद्धतीचा वापर केला जातो.

**(६) सीमांत तत्त्वाचा वापर :** उपभोक्ता व उत्पादक यांद्वारे सीमांत परिणामाच्या तत्त्वानुसार विविध आर्थिक निर्णय घेतले जातात. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्रात विश्लेषणाचे साधन म्हणून सीमांत तत्त्वाचा वापर केला जातो.

**(७) बाजार रचनांचे विश्लेषण :** पूर्ण स्पर्धा, मक्तेदारी, अल्पाधिकार, मक्तेदारीयुक्त स्पर्धा इत्यादी बाजारपेठांच्या रचनेचे आणि या बाजारपेठांमध्ये वस्तूंच्या किमती व उत्पादनाचे परिमाण कसे निश्चित होते, याचे सूक्ष्म अर्थशास्त्राद्वारे स्पष्टीकरण केले जाते.

**(८) मर्यादित व्याप्ती :** सूक्ष्म अर्थशास्त्रात बेरोजगारी, भाववाढ किंवा मंदी, दारिद्र्य, व्यवहारतोलातील शेष इत्यादी राष्ट्रीय पातळीवरील आर्थिक समस्यांची चर्चा होत नाही. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती मर्यादित आहे.

**(२) सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.**

**उत्तर :** सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती ही किंमत सिद्धांत आणि साधनसामग्रीचे वाटप ही आहे. कोणत्या वस्तूचे उत्पादन करावे, ते किती प्रमाणात करावे, उत्पादन कुणी करावे, कोणत्या पद्धतीने उत्पादन करावे, उत्पादित वस्तू व सेवांचे लोकांमध्ये विभाजन कसे करावे, साधनसामग्रीचे उत्पादन व उपभोग यांसाठी कार्यक्षम वितरण कसे करावे इत्यादी आर्थिक प्रश्न सोडवण्यावर सूक्ष्म अर्थशास्त्र भर देते. या अनुषंगाने सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते :

**(अ) किंमत सिद्धांत :** सूक्ष्म अर्थशास्त्राच्या व्याप्तीत पुढील किंमत सिद्धांतांचा समावेश होतो :

**(१) वस्तू व सेवा यांच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत :** सूक्ष्म अर्थशास्त्रात वस्तू व सेवांच्या किंमत निर्धारणाचा अभ्यास केला जातो. वस्तूंच्या व सेवांच्या किमती या त्यांच्या मागणीच्या व पुरवठ्याच्या समतोलातून ठरतात. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्रात मागणी, पुरवठा, उत्पादनखर्च, उत्पादन फलन यांच्या सिद्धांतांचा समावेश होतो.

**(२) उत्पादन घटकांच्या किंमत निश्चितीचे सिद्धांत :** सूक्ष्म अर्थशास्त्रात उत्पादन घटकांच्या किंमत निर्धारणाचाही अभ्यास केला जातो. भूमी, श्रम, भांडवल व संयोजक या चार उत्पादन घटकांच्या किमती (मोबदले) म्हणजेच अनुक्रमे खंड, वेतन, व्याज व नफा हे

त्यांच्या मागणीच्या व पुरवठ्याच्या समतोलातून ठरतात. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्रात खंड, वेतन, व्याज व नफा यांच्या सिद्धांतांचा समावेश होतो.

**(ब) आर्थिक कल्याणाचे सिद्धांत :** सूक्ष्म अर्थशास्त्राच्या व्याप्तीत आर्थिक कल्याणाच्या सिद्धांतांचा समावेश होतो. आर्थिक कल्याण हे प्रामुख्याने साधनसामग्रीच्या कार्यक्षम वाटपाशी संबंधित असते. साधनसामग्रीच्या झालेल्या वाटपामुळे संपूर्ण समाजाला महत्तम समाधान प्राप्त होत असेल तर ते वाटप कार्यक्षम वाटप असते. साधनांच्या कार्यक्षम वाटपामुळे समाजाचे जास्तीत जास्त आर्थिक कल्याणाचे उद्दिष्ट साध्य होते. सूक्ष्म अर्थशास्त्रात पुढील आर्थिक कार्यक्षमतांचा अभ्यास केला जातो :

**(१) उत्पादन क्षेत्रातील कार्यक्षमता :** उपलब्ध साधनसामग्रीच्या मदतीने जास्तीत जास्त उत्पादन घडवून आणणे, म्हणजे उत्पादन क्षेत्रातील कार्यक्षमता होय. सूक्ष्म अर्थशास्त्र उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारे महत्तम उत्पादन कशा प्रकारे घडवून आणता येईल, याचे स्पष्टीकरण करते.

**(२) उपभोगाच्या क्षेत्रातील कार्यक्षमता :** संपूर्ण समाजास जास्तीत जास्त समाधान प्राप्त होईल, अशा पद्धतीने उत्पादित वस्तू व सेवांचे लोकांमध्ये वितरण होणे म्हणजे उपभोगाच्या क्षेत्रातील कार्यक्षमता होय. सूक्ष्म अर्थशास्त्र महत्तम समाधान कशा प्रकारे प्राप्त होईल याचे स्पष्टीकरण करते.

**(३) एकूण आर्थिक कार्यक्षमता :** लोकांना प्राधान्याने हव्या असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन होणे म्हणजे एकूण आर्थिक कार्यक्षमता होय. सूक्ष्म अर्थशास्त्र एकूण आर्थिक कार्यक्षमता कशी प्राप्त होईल, याचे स्पष्टीकरण करते.

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, सूक्ष्म अर्थशास्त्राच्या व्याप्तीत किंमत सिद्धांत व साधनसामग्रीचे वाटप यांचा समावेश होतो. या शाखेत संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित समग्र परिमाणांचा अभ्यास केला जात नाही. या शाखेत बेकारी, दारिद्र्य, उत्पन्नाची विषमता यांसारख्या राष्ट्रीय पातळीवरील आर्थिक समस्यांचा अभ्यास केला जात नाही. आर्थिक वृद्धीचे सिद्धांत, व्यापारचक्रांचे सिद्धांत, चलनविषयक व राज्यवित्तीय धोरणे इत्यादी घटक या शाखेच्या अभ्यासाच्या कक्षेबाहेर आहेत. त्यामुळे स्थूल अर्थशास्त्राच्या तुलनेत सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याप्ती मर्यादित आहे.

### *(३) सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.

**उत्तर :** सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते :

**(१) किंमत निर्धारण स्पष्टीकरण :** मागणी व पुरवठ्याच्या समतोलातून वस्तू व सेवा आणि उत्पादन घटकांच्या किमती कशा ठरतात, याचे स्पष्टीकरण सूक्ष्म अर्थशास्त्रात केले जाते.

**(२) मुक्त बाजारपेठीय अर्थव्यवस्थेची कार्यपद्धती समजण्यास उपयोगी :** मागणी व पुरवठ्याच्या तत्त्वानुसार मुक्त बाजारपेठीय (भांडवलशाही) अर्थव्यवस्थेचे कार्य कशा प्रकारे चालते, याच्या स्पष्टीकरणासाठी सूक्ष्म आर्थिक सिद्धांत उपयोगी ठरतात. सूक्ष्म अर्थशास्त्र कोणते उत्पादन करावे, कसे उत्पादन करावे, किती उत्पादन करावे यांसारखे आर्थिक निर्णय खाजगी पातळीवर घेण्यास वैयक्तिक उत्पादकास उपयुक्त ठरते.

**(३) विदेशी / आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अभ्यासात साहाय्यक :** आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ, विनिमय दराची निश्चिती, जकातींचे परिणाम इत्यादींचे स्पष्टीकरण करण्यासाठी सूक्ष्म विश्लेषण उपयुक्त ठरते.

**(४) आर्थिक प्रारूपांच्या निर्मितीत उपयुक्त :** अर्थव्यवस्थेतील गुंतागुंतीची आर्थिक परिस्थिती स्पष्ट करणाऱ्या प्रारूपांच्या निर्मितीत सूक्ष्म अर्थशास्त्र उपयुक्त ठरते. सूक्ष्म अर्थशास्त्रातील अनेक संज्ञा, संकल्पना, आर्थिक परिभाषा, विश्लेषणाची साधने यांनी अर्थशास्त्राला मौलिक स्वरूप प्राप्त करून दिले आहे.

**(५) उद्योजकांना व्यावसायिक निर्णय घेण्यासाठी उपयोग :** किंमत, उत्पादनखर्च, गुंतवणूक, महत्तम उत्पादकता, वस्तूचा भविष्यकालीन मागणीचा अंदाज इत्यादींसंबंधी निर्णय घेण्यासाठी उद्योजकांना सूक्ष्म अर्थशास्त्रातील किंमत सिद्धांताचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

**(६) शासनास उपयुक्त :** आर्थिक धोरणे आखण्यासाठी शासनास सूक्ष्म विश्लेषणाचा उपयोग होतो. करविषयक धोरणे, सार्वजनिक खर्चविषयक धोरणे, किंमतविषयक धोरणे, साधनांच्या कार्यक्षम वाटपासंबंधी धोरणे इत्यादी धोरणे आखण्यासाठी सूक्ष्म विश्लेषण शासनास मार्गदर्शन करते.

**(७) कल्याणकारी अर्थशास्त्राचा आधार :** सूक्ष्म अर्थशास्त्रात आर्थिक कल्याणाच्या निकषांची चिकित्सा होते. साधनांचा अपव्यय टाळून महत्तम कल्याणाचे उद्दिष्ट कसे साधता येते, याचे विवेचन सूक्ष्म अर्थशास्त्रात केले जाते.

अशा प्रकारे सूक्ष्म अर्थशास्त्र हे सैद्धांतिक तसेच व्यावहारिक-दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचे आहे.

### *(४) स्थूल अर्थशास्त्राची संकल्पना वैशिष्ट्यांसह स्पष्ट करा.

**उत्तर :** (१) स्थूल अर्थशास्त्र हे समग्रलक्षी अर्थशास्त्र किंवा समष्टी अर्थशास्त्र म्हणूनही ओळखले जाते. स्थूल अर्थशास्त्राला इंग्रजीत Macroeconomics असे म्हणतात. इंग्रजीतील 'Macro' हा शब्द ग्रीक भाषेतील 'Makros' या शब्दापासून घेतलेला आहे. 'Macro' या शब्दाचा अर्थ मोठा, समग्र किंवा स्थूल (एकूण) असा होतो. यावरून स्थूल अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील समग्र आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो. अर्थशास्त्र उत्पन्न व रोजगार सिद्धांत किंवा उत्पन्न विश्लेषण म्हणूनही ओळखले जाते. स्थूल अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) समग्र घटकांचा अभ्यास :** स्थूल अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला जातो. संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न, एकूण रोजगार पातळी, एकूण मागणी, एकूण पुरवठा, एकूण उपभोग, एकूण गुंतवणूक, सर्वसाधारण किंमत पातळी इत्यादी समग्र घटकांचा अभ्यास या शाखेत होतो.

**(२) उत्पन्न विश्लेषण :** स्थूल अर्थशास्त्र हे उत्पन्न व रोजगार सिद्धांत किंवा उत्पन्न विश्लेषण म्हणून ओळखले जाते. समग्रलक्षी विश्लेषण हे प्रामुख्याने अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाची व एकूण रोजगार पातळी कशी निश्चित होते आणि त्यात बदल किंवा चढ-उतार कोणत्या कारणांनी घडून येतो, याचे विवेचन करणारे आहे. तसेच राष्ट्रीय उत्पन्नात दीर्घकाळात कशी वाढ होते आणि सामाजिक लेखांकन या संबंधीचे सविस्तर विवेचनही हे विश्लेषण करते.

**(३) सर्वसाधारण समतोलाचा अभ्यास :** समग्रलक्षी अर्थशास्त्रीय विश्लेषण हे सर्वसाधारण समतोलाचे विश्लेषण करते. हे विश्लेषण संपूर्ण अर्थव्यवस्थेचा समतोल कसा प्रस्थापित होतो याचे स्पष्टीकरण करते. समग्रलक्षी अर्थशास्त्रीय विश्लेषणात अर्थव्यवस्थेतील अनेक आर्थिक चलांच्या वर्तनाचा एकाच वेळी अभ्यास केला जातो व हा अभ्यास करताना विविध आर्थिक घटकांमधील फलनात्मक संबंध व त्यांच्यातील परस्परावलंबन विचारात घेतले जाते. सर्वसाधारण समतोलामध्ये सर्वच घटक इतर सर्व घटकांशी संबंधित असतात, असे मानले जाते.

सर्वसाधारण समतोलात एकूण मागणी व एकूण पुरवठा यांच्या समतोलाद्‌वारे सर्वसाधारण किंमत पातळी कशी निश्चित होते व त्याद्‌वारे एकूण उत्पन्न व रोजगाराची पातळी कशी निश्चित होते, याचे स्पष्टीकरण केले जाते. समग्रलक्षी अर्थशास्त्रीय विश्लेषणात अनेक समग्रलक्षी आर्थिक चले, त्यांचे आंतरसंबंध, परस्परावलंबन व त्यांचे एकमेकांवर होणारे परिणाम या सगळ्यांचा अभ्यास केला जातो.

**(४) परस्परावलंबनाचा विचार :** स्थूल अर्थशास्त्रात राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार पातळी, एकूण गुंतवणूक, किंमत पातळी इत्यादी समग्रलक्षी आर्थिक चलांमधील परस्परावलंबन लक्षात घेतले जाते. **उदा.,** गुंतवणूक पातळीवरील बदल हा राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन व रोजगार पातळी या सर्वांमध्ये कसा बदल घडवून आणतो व अंतिमत: आर्थिक विकासाच्या पातळीत कसा बदल घडवून आणतो, याचे स्पष्टीकरण समग्रलक्षी विवेचनात आढळते.

**(५) राशी पद्‌धतीचा अवलंब :** समग्रलक्षी विश्लेषण हे समुच्चयात्मक स्वरूपाचे आहे. यामध्ये संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील समग्रांचा म्हणजेच आर्थिक चलांच्या बेरजांच्या रूपातील एकूण परिमाणांचा (समुच्चयांचा) अभ्यास केला जातो. म्हणजेच समग्रलक्षी अर्थशास्त्राचे विवेचन हे एकूण मागणी, एकूण पुरवठा, राष्ट्रीय उत्पादन इत्यादी समग्रलक्षी चलांशी संबंधित असते. त्यामुळे या अर्थशास्त्रात राशी पद्‌धतीचा अवलंब केला जातो.

**(६) वृद्‌धीच्या प्रारूपांचा विचार :** स्थूल अर्थशास्त्रात आर्थिक वृद्‌धी व आर्थिक विकासातील विविध घटकांचा सहभाग सविस्तररीत्या अभ्यासला जातो. स्थूल अर्थशास्त्र आर्थिक वृद्‌धीची प्रारूपे विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरते. आर्थिक विकासाच्या अभ्यासासाठी आर्थिक वृद्‌धीची प्रारूपे उपयोगी ठरतात. **उदा.,** मूलभूत व अवजड उद्‌योगांवर भर देणारे महालनोबिस वृद्‌धी प्रारूप.

**(७) सर्वसाधारण किंमत पातळीचा अभ्यास :** स्थूल अर्थशास्त्रात सर्वसाधारण किंमत पातळी निश्चिती व त्यातील बदल यांचा अभ्यास केला जातो. सर्वसाधारण किंमत पातळी म्हणजे अर्थव्यवस्थेतील सद्य:स्थितीत उत्पादित केलेल्या सर्व वस्तू व सेवांच्या किमतींची सरासरी होय. स्थूल अर्थशास्त्रात सर्वसाधारण किंमत पातळीत होणाऱ्या चढउतारांचा, म्हणजेच व्यापारचक्राचा अभ्यास केला जातो.

**(८) आर्थिक धोरणाभिमुख :** लॉर्ड केन्स यांच्या मते, समग्रलक्षी अर्थशास्त्र हे आर्थिक समस्या सोडवणाऱ्या धोरणांची चर्चा करणारे शास्त्र आहे. **उदा.,** भाववाढ रोखणे, रोजगार निर्माण करणे, अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढणे, देशाचा वेगाने आर्थिक विकास साधणे इत्यादी समग्रलक्षी उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी योग्य अशी आर्थिक धोरणे ठरवण्यास हे विश्लेषण मदत करते.

**(५) स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर :** स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व पुढील मुद्‌द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते :

**(१) अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्‌धतीचे विवेचन :** स्थूल आर्थिक विश्लेषण आर्थिक व्यवस्थेच्या कार्यपद्‌धतीची कल्पना देते. स्थूल आर्थिक विश्लेषण व्यापक आणि गुंतागुंतीच्या अर्थव्यवस्थेतील एकूण आर्थिक चलांचे आर्थिक वर्तन समजून घेण्यास उपयुक्त ठरते.

**(२) आर्थिक चढउतारांचे विश्लेषण :** उत्पन्नातील चढ-उतार, उत्पादन आणि रोजगारातील चढउतारांची कारणे, व्यापारचक्र तसेच त्यांचे नियंत्रण आणि त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी स्थूल अर्थशास्त्राचे विश्लेषण उपयुक्त ठरते.

**(३) राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार :** स्थूल अर्थशास्त्रातील विविध सिद्‌धांतांच्या अभ्यासामुळे राष्ट्रीय उत्पन्न आणि सामाजिक लेखा यांचे अनन्यसाधारण महत्त्व समोर आले आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास नवीन आर्थिक धोरणांची मांडणी करण्यास उपयुक्त ठरतो.

**(४) आर्थिक विकासाचा विचार :** स्थूल अर्थशास्त्रातील विविध सिद्‌धांतांच्या आधारे विकसनशील व अविकसित देशांतील दारिद्र्य, उत्पन्न व संपत्तीतील विषमता, लोकांच्या राहणीमानातील फरक इत्यादी आर्थिक व सामाजिक समस्या समजण्यास मदत होते. स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास या देशांत आर्थिक विकास साध्य करण्यासाठी मदत करतो.

**(५) अर्थव्यवस्थेच्या कामगिरीच्या मापनास साहाय्यभूत :** संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे विश्लेषण करण्यासाठी स्थूल अर्थशास्त्र उपयुक्त ठरते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग दीर्घकाळात अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे मापन करण्यासाठी केला जातो. एका कालावधीतील उत्पादित वस्तू व सेवांची दुसऱ्या कालावधीतील उत्पादित वस्तू व सेवांशी तुलना करण्यासाठी स्थूल अर्थशास्त्र मदत करते.

**(६) स्थूल आर्थिक चलांचा अभ्यास :** अर्थव्यवस्थेचे कार्य समजून घेण्यासाठी स्थूल अर्थशास्त्रात स्थूल आर्थिक चलांचा अभ्यास केला जातो. भारताच्या अर्थव्यवस्थेतील मुख्य आर्थिक समस्या या एकूण उत्पन्न, उत्पादन व रोजगार आणि सामान्य किंमत पातळी यांसारख्या आर्थिक चलांशी संबंधित आहेत. या समस्यांचाही स्थूल अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो.

**(७) सामान्य रोजगार पातळी :** स्थूल अर्थशास्त्र रोजगाराची सर्वसाधारण पातळी आणि समग्र उत्पादनाचे विश्लेषण करण्यास मदत करते.

**(६) स्थूल अर्थशास्त्राची ऐतिहासिक वाटचाल सांगा.**

**उत्तर :** स्थूल अर्थशास्त्राची ऐतिहासिक वाटचाल पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते :

(१) अर्थव्यवस्थेचा समग्र पातळीवरील अभ्यास करण्याचा दृष्टिकोन हा तुलनेने नवा आहे.

(२) ऐतिहासिकदृष्ट्या सूक्ष्म विश्लेषणाचा प्रारंभ व विकास आधी झाला व स्थूल (समग्रलक्षी) विश्लेषणाचा विकास हा त्यानंतरच्या काळात झालेला दिसतो. स्थूल दृष्टिकोन हा जरी आधुनिक समजला जात असला तरी सूक्ष्म दृष्टिकोनाच्या आधीही आर्थिक विवेचनात त्याचा विचार झालेला आढळतो.

(३) १६ व्या व १७ व्या शतकात व्यापारवादी विचारवंतांनी (Mercantilist – इंग्रज व्यापाऱ्यांचा गट) शासनाला ज्या शिफारशी केल्या व धोरणे सुचवली, ती संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या संदर्भातच होती.

(४) १८ व्या शतकात निसर्गवादी (फ्रेंच विचारवंत – Physiocrates) विचारवंतांनीसुद्धा राष्ट्रीय उत्पन्न आणि संपत्ती या संकल्पनेचे विश्लेषण केलेले होते.

(५) सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ प्रा. ॲडम स्मिथ, प्रा. रिकार्डो, प्रो. जे. एस. मिल यांच्या सिद्धांतातही राष्ट्रीय उत्पन्नाचे एकूण वेतन, एकूण खंड व एकूण नफा यांमध्ये होणारे विभाजन यांची चर्चा केलेली आढळते. परंतु त्यांचे समग्रलक्षी विश्लेषण हे सूक्ष्मलक्षी विश्लेषणात मिसळून एकत्र केलेले दिसते.

(६) त्यानंतर नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञ विशेषत: **डॉ. मार्शल** आणि **प्रा. पिगू** यांच्या काळात समग्रलक्षी आर्थिक विचार मागे पडलेला दिसतो. त्यांच्या सूक्ष्मलक्षी आर्थिक विश्लेषणाने १९३० च्या जागतिक महामंदीपर्यंत अर्थशास्त्राच्या जगात राज्य केले.

(७) जागतिक महामंदीनंतर मात्र अर्थशास्त्रीय विचारांत मूलभूत व क्रांतिकारी बदल झालेले दिसतात. **लॉर्ड जॉन मेनार्ड केन्स** यांचे **'पैसा, व्याज व रोजगारविषयक सामान्य सिद्धांत'** (General Theory of Employment, Interest and Money) हे युगप्रवर्तक पुस्तक १९३६ मध्ये प्रकाशित झाले. लॉर्ड केन्स यांनी आर्थिक समस्यांचा अभ्यास स्थूल विश्लेषण पद्धतीने केला, केन्सचा सिद्धांत प्रकाशित झाल्यानंतर आर्थिक विश्लेषणाची समग्रलक्षी पद्धत ही जास्त लोकप्रिय व महत्त्वाची पद्धत म्हणून विकसित झाली. त्यामुळे स्थूल दृष्टिकोनाच्या विकासाचे श्रेय हे **लॉर्ड केन्स** यांनाच दिले जाते.

(८) अर्थात समग्रलक्षी अभ्यास पद्धतीच्या विकासात केन्स व्यतिरिक्त **माल्थस, कार्ल मार्क्स, विकसेल, वॉलरा, फिशर** इत्यादी अर्थशास्त्रज्ञांचे योगदानही मोलाचे आहे.

# २ उपयोगिता विश्लेषण

**महत्त्वाच्या संकल्पना :**

**(१) एकूण उपयोगिता :** वस्तूच्या एकापाठोपाठ एक सेवन केलेल्या सर्व नगांपासून मिळालेल्या उपयोगितांची होणारी बेरीज, म्हणजे 'एकूण उपयोगिता' होय.

**(२) सीमांत उपयोगिता :** वस्तूच्या शेवटच्या नगाच्या सेवनापासून प्राप्त होणारी अधिकतम (अतिरिक्त) उपयोगिता, म्हणजे 'सीमांत उपयोगिता' होय.

**(३) तृप्ती बिंदू :** तृप्ती बिंदू हा असा बिंदू होय जेथे वस्तूची गरज पूर्णपणे भागते. तृप्ती बिंदूच्या ठिकाणी एकूण उपयोगिता सर्वाधिक व सीमांत उपयोगिता शून्य असते.

## महत्त्वाचे मुद्दे

### १. प्रस्तावना :

(१) मानवी गरजा अमर्याद असतात व मानवाकडे उपलब्ध असलेली साधनसंपत्ती तुलनेने मर्यादित असते. त्यामुळे मानवाला सर्व गरजा एकाच वेळी पूर्ण करणे शक्य नसते.

(२) परंतु उपयोगिता विश्लेषणाचा आधार घेऊन मानवाला विशिष्ट गरज एखाद्या वेळी निश्चितपणे पूर्ण करता येते व त्याद्वारे महत्तम समाधान प्राप्त करता येते.

### २. उपयोगितेची वैशिष्ट्ये :

उपयोगितेची वैशिष्ट्ये पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट करण्यात आली आहेत :

| उपयोगितेची वैशिष्ट्ये |
|---|
| १. स्थळानुसार तसेच काळानुसार बदलत जाते. |
| २. व्यक्तिव्यक्तीनुसार बदलत जाते. |
| ३. चांगले-वाईट, नैतिक-अनैतिक अशा बाबींचा उपयोगितेच्या संकल्पनेत विचार केला जात नाही. |
| ४. उपयुक्तता या संकल्पनेपेक्षा भिन्न आहे. |
| ५. आनंद या संकल्पनेपेक्षा भिन्न आहे. |
| ६. समाधान या संकल्पनेपेक्षा भिन्न आहे. |
| ७. मानसशास्त्रीय संकल्पना असल्यामुळे संख्यात्मक मापन करता येत नाही. |
| ८. एकाच वस्तूद्वारे एकाहून अधिक व्यक्तींच्या निरनिराळ्या गरजा भागू शकत असल्यामुळे बहुपर्यायी आहे. |
| ९. गरजेच्या तीव्रतेशी सम संबंध आढळतो. |
| १०. मागणीचा आधार आहे. |

### ३. उपयोगितेचे प्रकार :

उपयोगितेचे प्रकार पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट करण्यात आले आहेत :

| उपयोगितेचे प्रकार | स्पष्टीकरण |
|---|---|
| १. रूप उपयोगिता | वस्तूंचे स्वरूप बदलल्यामुळे वाढलेली उपयोगिता. |
| २. स्थल उपयोगिता | वस्तूचे स्थलांतर केल्यामुळे वाढलेली उपयोगिता. |
| ३. सेवा उपयोगिता | समाजातील विविध घटकांनी पुरवलेल्या सेवांमधून मिळणारी उपयोगिता. |
| ४. ज्ञान उपयोगिता | विशिष्ट वस्तूचे ज्ञान प्राप्त करून त्यापासून मिळणारी उपयोगिता. |
| ५. स्वामित्व उपयोगिता | वस्तूच्या मालकी हक्कामुळे मिळणारी उपयोगिता. |
| ६. काल उपयोगिता | वस्तूच्या वापराचा काळ बदलून वाढवलेली उपयोगिता. |

### ४. उपयोगितेच्या संकल्पना :

**(१) एकूण उपयोगिता :** वस्तूच्या एकापाठोपाठ एक सेवन केलेल्या सर्व नगांपासून मिळणारी एकत्रित उपयोगिता म्हणजे एकूण उपयोगिता होय.

**(२) सीमांत उपयोगिता :** वस्तूच्या शेवटच्या वाढीव नगाच्या सेवनाने मिळणारी उपयोगिता म्हणजे सीमांत उपयोगिता होय.

**(३) एकूण उपयोगिता आणि सीमांत उपयोगिता यांतील संबंध :**

(१) वस्तूच्या पहिल्या नगाच्या सेवनाच्या वेळी एकूण उपयोगिता आणि सीमांत उपयोगिता या समान असतात.

(२) त्यानंतर वस्तूच्या नगांच्या सेवनाच्या वेळी एकूण उपयोगिता घटत्या दराने वाढते आणि सीमांत उपयोगिता क्रमशः घटत जाते.

(३) जेव्हा सीमांत उपयोगिता शून्य होते, तेव्हा एकूण उपयोगिता महत्तम असते. (सर्वाधिक समाधान)

(४) जेव्हा सीमांत उपयोगिता ऋण होते, तेव्हा एकूण उपयोगिताही घटते. (असमाधान)

(५) सर्वाधिक समाधानानंतर सर्वसाधारण उपभोक्ता वस्तूचा उपभोग घेण्याचे थांबवतो.

(६) सर्वाधिक समाधानानंतर वस्तूचा उपभोग चालू ठेवला असता, समाधानाचे असमाधानात रूपांतर होते.

## ५. घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत :

घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत सर्वप्रथम प्रा. गॉसेन यांनी मांडला. परंतु त्यानंतर प्रा. आल्फ्रेड मार्शल यांनी १८९० साली आपल्या 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' या ग्रंथात हा सिद्धांत विस्तृत स्वरूपात सादर केला.

**सिद्धांताचे विधान :** प्रा. आल्फ्रेड मार्शल यांच्या मते, ''इतर परिस्थिती कायम असताना मनुष्याजवळ आधीपासून असलेल्या एखाद्या वस्तूच्या साठ्यात वाढ होत गेल्यास त्यापासून मिळणारे अतिरिक्त समाधान, त्या वस्तूच्या साठ्यात होणाऱ्या वाढीबरोबर क्रमशः घटत जाते.''

## ६. घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताची गृहीतके :

घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत पुढील गृहीतकांवर अवलंबून आहे :

(१) वस्तूच्या नगांचे एकापाठोपाठ एक सेवन करणारा उपभोक्ता विवेकशील आहे.

(२) उपयोगिता अंकामध्ये मोजता येते असे गृहीत धरले जाते.

(३) उपभोक्ता सेवन करीत असलेल्या वस्तूंचे सर्व नग एकजिनसी आहेत.

(४) वस्तूच्या विविध नगांच्या सेवनात निरंतरता (सातत्य) आहे.

(५) उपभोग्य वस्तूचा आकार फार मोठा किंवा फार लहान नसून मध्यम आहे.

(६) उपभोगाच्या कालावधीत उपभोक्त्याची उत्पन्नपातळी, आवड, पसंती व वस्तूची किंमत इत्यादी घटक स्थिर आहेत.

(७) उपभोक्त्याने उपभोगात आणलेली वस्तू विभाज्य आहे.

(८) वस्तूचा वापर केवळ एकच गरज भागवण्यासाठी केला जातो.

(९) उपभोक्त्याच्या शिल्लक राहिलेल्या पैशातील उत्पन्नाची सीमांत उपयोगिता स्थिर आहे.

## ७. घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे अपवाद :

घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताला खऱ्या अर्थाने कोणतेही अपवाद नाहीत. या सिद्धांताचे काही बोलण्यापुरते असणारे (भासमान) अपवाद पुढीलप्रमाणे आहेत :

(१) **छंद :** दुर्मीळ वस्तूंच्या साठ्यात वाढ झाल्यास तसेच आवडते संगीत वारंवार ऐकल्यास किंवा आवडते पुस्तक वारंवार वाचल्यास अधिकाधिक उपयोगिता मिळते असे म्हटले जाते.

(२) **कंजूष व्यक्ती :** कंजूष व्यक्तीस पैशापासून अधिकाधिक उपयोगिता मिळते असे म्हटले जाते.

(३) **अमली पदार्थांचे व्यसन :** मद्याच्या अधिकाधिक सेवनातून अधिकाधिक उपयोगिता मिळते असे म्हटले जाते.

(४) **सत्ता :** अधिकाधिक सत्तेपासून अधिकाधिक उपयोगिता मिळते असे म्हटले जाते.

(५) **पैसा :** अधिकाधिक पैशापासून अधिकाधिक उपयोगिता मिळत जाते असे म्हटले जाते.

परंतु वरील सर्व अपवादांच्या बाबतीत सिद्धांताच्या एकजिनसीपणा, सातत्य, उपभोक्त्याचा विवेकीपणा इत्यादी गृहीतकांच्या अटी लागू केल्यास हे अपवाद खऱ्या अर्थाने अपवाद राहत नाहीत.

## ८. घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताच्या मर्यादा :

घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतास पुढील मर्यादा आहेत :

(१) **अवास्तव गृहीतके :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत हा वस्तूच्या नगांचा एकजिनसीपणा, उपभोग सातत्य, पैशाच्या उपयोगितेत स्थिरता, उपभोक्त्याचे विवेकपूर्ण वर्तन इत्यादी अवास्तव गृहीतकांवर आधारलेला आहे.

(२) **संख्यात्मक मापन :** उपयोगितेचे संख्यात्मक मापन व तुलनात्मक विवेचन करणे शक्य असते असे सिद्धांत गृहीत धरतो. परंतु प्रत्यक्षात उपयोगितेचे संख्येत मोजमाप करणे शक्य नसते.

(३) **अविभाज्य वस्तू :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत दूरदर्शन संच, गाडी, घर अशा अविभाज्य वस्तूंसाठी लागू पडत नाही.

(४) **पैशाची स्थिर सीमांत उपयोगिता :** पैशाच्या प्रत्येक एककाची सीमांत उपयोगिता स्थिर राहते असे सिद्धांत गृहीत धरतो. परंतु प्रत्यक्षात पैशाची सीमांत उपयोगिता स्थिर राहत नाही.

(५) **एकच गरज :** हा सिद्धांत केवळ विशिष्ट वेळी एकाच वस्तूच्या उपभोगातून मिळणाऱ्या समाधानापुरता मर्यादित आहे. परंतु प्रत्यक्षात मनुष्य एकाच वेळी अनेक गरजा पूर्ण करून समाधान मिळवण्याचा प्रयत्न करीत असतो.

## ९. घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे उपयोग :

घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे उपयोग पुढीलप्रमाणे आहेत :

(१) उपभोक्त्याला महत्तम समाधान प्राप्तीत घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उपयोगी पडतो.

(२) शासनास प्रगतिशील कर धोरण, किंमत धोरण, व्यापार धोरण इत्यादी विविध प्रकारच्या आर्थिक योजना राबवण्यासाठी घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उपयुक्त ठरतो.

(३) पाणी, हवा, सूर्यप्रकाश आणि हिरा, सोने या वस्तूंच्या उपयोगिता मूल्यातील आणि विनिमय मूल्यातील विरोधाभास स्पष्ट करण्यासाठी घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उपयुक्त ठरतो.

(४) मागणीच्या सिद्धांतासाठी घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत आधार ठरतो. जेव्हा एकाच वस्तूचे अधिकाधिक नग खरेदी केले जातात, तेव्हा सीमांत उपयोगिता क्रमशः घटत जाते. त्यामुळे वस्तूचे अधिकाधिक नग कमी किमतीला खरेदी केले जातात.

### १०. सीमांत उपयोगिता व किंमत यांतील संबंध :

(१) वस्तूच्या सीमांतपूर्व नगांमधून मिळणारी सीमांत उपयोगिता वस्तूच्या बाजार किमतीपेक्षा जास्त असते. त्यामुळे वस्तूच्या सीमांतपूर्व नगांची विवेकशील उपभोक्त्याकडून मागणी केली जाते.

(२) वस्तूच्या सीमांत नगामधून मिळणारी सीमांत उपयोगिता वस्तूच्या बाजार किमतीएवढी असते. त्यामुळे वस्तूच्या सीमांत नगाच्या ठिकाणी विवेकशील उपभोक्त्याकडून मागणी थांबवली जाते.

(३) वस्तूच्या सीमांतोत्तर नगांमधून मिळणारी सीमांत उपयोगिता वस्तूच्या बाजार किमतीपेक्षा कमी असते. त्यामुळे वस्तूच्या सीमांतोत्तर नगांची विवेकशील उपभोक्त्याकडून मागणी केली जात नाही.

## प्रश्नोत्तरे

### प्र. ❶ योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा :

***(प्रत्येकी १ गुण)***

*[ १ ]

(१) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात आल्फ्रेड मार्शल यांनी गृहीत धरलेली पैशाची उपयोगिता ---------

*(अ) वाढते (ब) स्थिर राहते*
*(क) घटते (ड) वाढते आणि नंतर घटते*

(२) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात सीमांत उपयोगितेची संकल्पना ---------

*(अ) क्रमवाचक संकल्पना*
*(ब) संख्यात्मक संकल्पना*
*(क) क्रमवाचक संकल्पना आणि संख्यात्मक संकल्पना दोन्हीही*
*(ड) यांपैकी नाही*

(३) जेव्हा सीमांत उपयोगिता ऋण होते, तेव्हा एकूण उपयोगिता ---------

*(अ) वाढते (ब) स्थिर असते*
*(क) घटते (ड) शून्य असते*

(४) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात सर्वाधिक समाधानाचा (तृप्ती) बिंदू म्हणजे जेव्हा ---------

*(अ) एकूण उपयोगिता वाढते आणि सीमांत उपयोगिता घटते.*
*(ब) एकूण उपयोगिता घटते आणि सीमांत उपयोगिता ऋण होते.*
*(क) एकूण उपयोगिता महत्तम होते आणि सीमांत उपयोगिता शून्य होते.*
*(ड) सीमांत उपयोगिता घटते आणि एकूण उपयोगिता वाढते.*

(५) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात जेव्हा सीमांत उपयोगिता शून्यापेक्षाही खाली घटते तेव्हा एकूण उपयोगिता ---------

*(अ) वाढते (ब) घटते*
*(क) बदलत नाही (ड) महत्तम होते*

**उत्तरे :** (१) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात आल्फ्रेड मार्शल यांनी गृहीत धरलेली पैशाची उपयोगिता स्थिर राहते.

(२) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात सीमांत उपयोगितेची संकल्पना संख्यात्मक संकल्पना.

(३) जेव्हा सीमांत उपयोगिता ऋण होते, तेव्हा एकूण उपयोगिता घटते.

(४) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात सर्वाधिक समाधानाचा (तृप्ती) बिंदू म्हणजे जेव्हा एकूण उपयोगिता महत्तम होते आणि सीमांत उपयोगिता शून्य होते.

(५) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात जेव्हा सीमांत उपयोगिता शून्यापेक्षाही खाली घटते तेव्हा एकूण उपयोगिता घटते.

[ २ ]

(१) वस्तूमधील गरज भागवण्याची क्षमता म्हणजे --------- होय.

*(अ) उपयुक्तता (ब) उपयोगिता*
*(क) समाधान (ड) आनंद*

(२) जेव्हा वस्तूचा उपभोग ---------, तेव्हा सीमांत उपयोगिता घटते.

*(अ) वाढतो (ब) घटतो*
*(क) स्थिर राहतो (ड) शून्य होतो*

(३) वस्तूच्या शेवटच्या घटकापासून मिळालेली उपयोगिता म्हणजे --------- उपयोगिता होय.

*(अ) सरासरी* *(ब) एकूण*

*(क) सीमांत* *(ड) शून्य*

(४) जेव्हा सीमांत उपयोगिता --------- होते, तेव्हा एकूण उपयोगिता सर्वाधिक असते.

*(अ) धन* *(ब) ऋण* *(क) शून्य* *(ड) जास्त*

(५) रक्तदानात --------- उपयोगिता असते.

*(अ) स्थल* *(ब) काल* *(क) ज्ञान* *(ड) रूप*

**उत्तरे :** (१) वस्तूमधील गरज भागवण्याची क्षमता म्हणजे उपयोगिता होय.

(२) जेव्हा वस्तूचा उपभोग वाढतो, तेव्हा सीमांत उपयोगिता घटते.

(३) वस्तूच्या शेवटच्या घटकापासून मिळालेली उपयोगिता म्हणजे सीमांत उपयोगिता होय.

(४) जेव्हा सीमांत उपयोगिता शून्य होते, तेव्हा एकूण उपयोगिता सर्वाधिक असते.

(५) रक्तदानात काल उपयोगिता असते.

### प्र. २ विसंगत शब्द ओळखा : *(प्रत्येकी १ गुण)*

(१) हवा, पाणी, सूर्यप्रकाश, सोने.

(२) पुस्तक, वही, खडू, दारू.

(३) शिक्षक, गायक, दंतवैद्य, खुर्ची.

(४) गाडी, दूरदर्शन संच, भाकरी, पट्टी.

(५) हिरे, सोने, चांदी, पाणी.

**उत्तरे :** (१) सोने (२) दारू (३) खुर्ची (४) भाकरी (५) पाणी.

### प्र. ३ सहसंबंध पूर्ण करा : *(प्रत्येकी १ गुण)*

(१) लाकडापासून फर्निचर : रूप उपयोगिता : : अभ्यासाचे पुस्तक : ______.

(२) वस्तूंचे स्थलांतर : स्थल उपयोगिता : : शिक्षकांचे शिकवणे : ______.

(३) सीमांतपूर्व नग : सीमांत उपयोगिता > किंमत : : ______ : सीमांत उपयोगिता < किंमत.

(४) आल्फ्रेड मार्शल : सीमांत उपयोगिता : : हिक्स व ॲलन : ______.

(५) पाणी : उपयोगिता मूल्य > विनिमय मूल्य : : ______ : उपयोगिता मूल्य < विनिमय मूल्य.

**उत्तरे :** (१) ज्ञान उपयोगिता (२) सेवा उपयोगिता (३) सीमांतोत्तर नग (४) क्रमवाचक उपयोगिता (५) हिरा.

### प्र. ४ योग्य अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सुचवा : *(प्रत्येकी १ गुण)*

**[ १ ]**

(१) पावसाळ्यात रेनकोटमधून मिळणारी उपयोगिता.

(२) संगणकाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर संगणकातून मिळणारी उपयोगिता.

(३) अशी वस्तू जिचे लहान परिमाणांत विभाजन करता येत नाही.

(४) मानवी गरज पूर्ण करण्याची वस्तूतील क्षमता.

(५) आरोग्यासाठी हितकारक ठरणारा वस्तूतील गुणधर्म.

**उत्तरे :** (१) काल उपयोगिता (२) ज्ञान उपयोगिता (३) अविभाज्य वस्तू (४) उपयोगिता (५) उपयुक्तता.

**[ २ ]**

(१) वस्तूच्या सर्व नगांपासून मिळालेली एकत्रित उपयोगिता.

(२) वस्तूच्या शेवटच्या वाढीव नगापासून मिळालेली उपयोगिता.

(३) सर्वाधिक समाधानाच्या बिंदूनंतरची स्थिती.

(४) मातीपासून भांडी बनवून निर्माण करण्यात आलेली उपयोगिता.

(५) असा वक्र जो दोन वस्तूंच्या संयोगाच्या विशिष्ट स्थानाला जोडणारा वक्र असून उपभोक्ता या वस्तूंच्या संयोजनाबद्दल तटस्थ असतो.

**उत्तरे :** (१) एकूण उपयोगिता (२) सीमांत उपयोगिता (३) असमाधानाची स्थिती (४) रूप उपयोगिता (५) समवृत्ती वक्र.

### प्र. ५ योग्य जोडीचा पर्याय निवडा : *(प्रत्येकी १ गुण)*

| * (१) 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) काल उपयोगिता | (अ) वाहतूक |
| (२) स्थल उपयोगिता | (ब) रक्तपेढी |
| (३) सेवा उपयोगिता | (क) मोबाइल फोन |
| (४) ज्ञान उपयोगिता | (ड) डॉक्टर |

**पर्याय :** (अ) १ – ड, २ – ब, ३ – अ, ४ – क.
(ब) १ – ब, २ – अ, ३ – ड, ४ – क.
(क) १ – अ, २ – ब, ३ – क, ४ – ड.
(ड) १ – ब, २ – क, ३ – ड, ४ – अ.

* (२) उपभोक्त्याचा समतोल दर्शवणारे विधान ---------

(अ) सीमांत उपयोगिता किमतीपेक्षा जास्त

(ब) सीमांत उपयोगिता व किमती समान

(क) सीमांत उपयोगिता किमतीपेक्षा कमी

(ड) किंमत एकापेक्षा कमी

**पर्याय :** (अ) अ आणि ब. (ब) अ, ब आणि क.
(क) अ, ब, क आणि ड. (ड) फक्त ब.

| (३) 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) सीमांत उपयोगिता | (अ) महत्तम एकूण उपयोगिता |
| (२) सर्वाधिक समाधानाचा बिंदू | (ब) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे गृहीतक |
| (३) रूप उपयोगिता | (क) शेवटच्या नगापासून मिळणारी उपयोगिता |
| (४) संख्यात्मक मूल्यमापन | (ड) कापसापासून कापड बनवणे |

**पर्याय :** (अ) १ – क, २ – अ, ३ – ड, ४ – ब.
(ब) १ – अ, २ – ड, ३ – क, ४ – ब.
(क) १ – ब, २ – ड, ३ – क, ४ – अ.
(ड) १ – क, २ – अ, ३ – ब, ४ – ड.

**उत्तरे : (१)** (ब) १ – ब, २ – अ, ३ – ड, ४ – क.
**(२)** (ड) फक्त ब.
**(३)** (अ) १ – क, २ – अ, ३ – ड, ४ – ब.

**प्र. ६ पुढील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :** ***(प्रत्येकी २ गुण)***

***(१) सलमाने हिवाळ्यात तिच्या वडिलांसाठी स्वेटर खरेदी केले.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** काल उपयोगिता.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** काळ बदलल्याने काळानुसार वस्तूमध्ये जी उपयोगिता निर्माण होते / वाढते ती उपयोगिता म्हणजे 'काल उपयोगिता' होय.

***(२) निलेशने त्याच्या बहिणीसाठी दागिने खरेदी केले.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** स्वामित्व उपयोगिता.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** वस्तूची मालकी एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित होते तेव्हा जी उपयोगिता निर्माण होते/वाढते ती उपयोगिता, म्हणजे 'स्वामित्व उपयोगिता' होय.

***(३) कविताने संत्र्याचे एकामागे एक पाच नग सेवन केले.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** उपभोग सातत्य.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** एखाद्या वस्तूच्या विविध नगांचे निरंतरपणे म्हणजेच सातत्याने (न थांबता) सेवन केले असता अशा उपभोगास 'उपभोग सातत्य' म्हणतात. उपभोग सातत्य हे घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे महत्त्वाचे गृहीतक आहे.

***(४) भूषणने चार चपात्या खाल्ल्यानंतर पाचवी चपाती खाण्यास नकार दिला.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** विवेकशील उपभोक्त्याचा सर्वाधिक समाधानाचा बिंदू.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** एखाद्या वस्तूच्या विविध नगांचे लागोपाठ सेवन केले असता / उपभोग घेतला असता, गरजेची तीव्रता कमी होत जाते व समाधान वाढत जाते. एका विशिष्ट बिंदूपाशी गरज पूर्णपणे भागते. हा बिंदू म्हणजे सर्वाधिक समाधानाचा (तृप्तीचा) बिंदू होय. सर्वाधिक समाधानाच्या बिंदूनंतर विवेकशील उपभोक्ता वस्तूच्या पुढील नगाच्या सेवनास नकार देतो.

***(५) ललिताने वही-पेनचा वापर करून निबंध लेखनाची गरज पूर्ण केली.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** उपयोगिता.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** मानवी गरज पूर्ण करण्याची वस्तूमधील क्षमता, म्हणजे 'उपयोगिता' होय.

**(६) सागरने उन्हाळ्यात शीतपेये विकण्याचा व्यवसाय सुरू केला.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** काल उपयोगिता.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** *उत्तरासाठी याच प्रश्नप्रकारातील (१) मधील (ब) पाहा.*

**(७) सोने जगण्यास आवश्यक नसूनही सोन्याची किंमत जास्त असते.**

**उत्तर : (अ) उदाहरणातील संकल्पना :** मूल्याचा विरोधाभास.

**(ब) संकल्पनेचे स्पष्टीकरण :** एखादी वस्तू दुर्मीळ असल्यास, त्या वस्तूचे उपयोगिता मूल्य (जगण्यासाठीची आवश्यकता) कमी असूनही विनिमय मूल्य (बाजारातील किंमत) जास्त असते. वस्तूच्या उपयोगितेत मूल्य आणि विनिमय मूल्य यांतील विरोधाभासाला 'मूल्याचा विरोधाभास' म्हणतात.

**प्र. ७ फरक स्पष्ट करा :** ***(प्रत्येकी २ गुण)***

**(१) उपयोगिता आणि उपयुक्तता :**

| उपयोगिता | उपयुक्तता |
|---|---|
| **१. अर्थ** | |
| मानवी गरज पूर्ण करणारा वस्तूमधील गुण म्हणजे 'उपयोगिता' होय. | मानवी शरीरास उपकारक ठरणारा वस्तूमधील गुण म्हणजे 'उपयुक्तता' होय. |
| **२. परस्परसंबंध** | |
| ज्या वस्तूमध्ये उपयोगिता असते, त्या वस्तूमध्ये उपयुक्तता असेलच असे नाही. | ज्या वस्तूमध्ये उपयुक्तता असते, त्या वस्तूमध्ये निश्चितपणे उपयोगिता असते. |

**(२) उपयोगिता आणि समाधान :**

| उपयोगिता | समाधान |
|---|---|
| **१. अर्थ** | |
| मानवी गरज पूर्ण करणारा वस्तूमधील गुण म्हणजे 'उपयोगिता' होय. | वस्तूच्या सेवनानंतर निर्माण होणारी आनंदाची भावना म्हणजे 'समाधान' होय. |

**२. स्वरूप**

| | |
|---|---|
| उपयोगिता ही उपभोगाची सुरुवात असते. | समाधान हा उपभोगाचा अंतिम परिणाम असतो. |

### (३) एकूण उपयोगिता आणि सीमांत उपयोगिता :

| एकूण उपयोगिता | सीमांत उपयोगिता |
|---|---|
| **१. अर्थ** | |
| वस्तूच्या एकापाठोपाठ एक सेवन केलेल्या सर्व नगांपासून मिळालेल्या उपयोगितांची होणारी बेरीज म्हणजे 'एकूण उपयोगिता' होय. | वस्तूच्या शेवटच्या नगाच्या सेवनापासून प्राप्त होणारी अधिकतम (अतिरिक्त) उपयोगिता, म्हणजे 'सीमांत उपयोगिता' होय. |
| **२. मूल्य** | |
| सर्वसाधारणपणे एकूण उपयोगितेचे मूल्य धन असते. | सीमांत उपयोगितेचे मूल्य धन, शून्य आणि ऋण असू शकते. |

### (४) स्थल उपयोगिता आणि काल उपयोगिता :

| स्थल उपयोगिता | काल उपयोगिता |
|---|---|
| **१. अर्थ** | |
| वस्तूच्या वापर करण्याच्या स्थानात बदल करून निर्माण केलेली उपयोगिता म्हणजे 'स्थल उपयोगिता' होय. | वस्तूच्या वापर करण्याच्या काळात निर्माण केलेली उपयोगिता म्हणजे 'काल उपयोगिता' होय. |
| **२. निर्मिती** | |
| वाहतुकीच्या साधनांचा वापर करून स्थल उपयोगिता निर्माण करता येते. | साठवणीच्या सोयींचा वापर करून काल उपयोगिता निर्माण करता येते. |

### (५) रूप उपयोगिता आणि काल उपयोगिता :


| रूप उपयोगिता | काल उपयोगिता |
|---|---|
| **१. अर्थ** | |
| वस्तूच्या स्वरूपात बदल करून निर्माण केलेली उपयोगिता म्हणजे 'रूप उपयोगिता' होय. | वस्तूच्या वापर करण्याच्या काळात बदल करून निर्माण केलेली उपयोगिता म्हणजे 'काल उपयोगिता' होय. |
| **२. निर्मिती** | |
| वस्तूचा रंग, रूप, आकार, बाह्य स्वरूप इत्यादींमध्ये बदल करून रूप उपयोगिता निर्माण केली जाते. | साठवणीच्या सोयींचा वापर करून काल उपयोगिता निर्माण केली जाते. |

## प्र. ८ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : *(प्रत्येकी ४ गुण)*

### (१) एकूण उपयोगिता आणि सीमांत उपयोगिता यांतील संबंध स्पष्ट करा.

**उत्तर :** एकूण उपयोगिता आणि सीमांत उपयोगिता यांतील संबंध पुढील कोष्टकाच्या, आकृतीच्या व मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतो :

| वस्तूचे नग | सीमांत उपयोगिता | एकूण उपयोगिता |
|---|---|---|
| १ | ०८ | ०८ |
| २ | ०६ | १४ |
| ३ | ०४ | १८ |
| ४ | ०२ | २० |
| ५ | ०० | २० |
| ६ | −०२ | १८ |




(१) वस्तूच्या सर्व नगांपासून मिळणाऱ्या उपयोगितांची बेरीज म्हणजे एकूण उपयोगिता होय. वस्तूच्या शेवटच्या नगापासून मिळणारी उपयोगिता म्हणजे सीमांत उपयोगिता होय.

(२) वस्तूच्या पहिल्या नगाच्या उपभोगाच्या वेळी एकूण उपयोगिता सर्वांत कमी आणि सीमांत उपयोगिता सर्वाधिक असते. वस्तूच्या पुढील नगाचे एकापाठोपाठ सेवन केले असता एकूण उपयोगिता घटत्या दराने वाढते आणि सीमांत उपयोगिता क्रमशः घटत जाते.

(३) सीमांत उपयोगिता स्थिर असताना एकूण उपयोगिता सर्वाधिक असते.

(४) सीमांत उपयोगिता ऋण झाली असता एकूण उपयोगिताही घटते.

### (२) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे महत्त्व स्पष्ट करा.

**उत्तर :** घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे :

NAVNEET ®

**(१) उपभोक्त्यांसाठी उपयुक्त :** महत्तम समाधान प्राप्त करण्याच्या दृष्टीने उपलब्ध साधनसामग्रीचा कशा प्रकारे वापर करावा, याची आखणी करण्यासाठी उपभोक्त्याला घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उपयुक्त ठरतो.

**(२) शासनासाठी उपयुक्त :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत शासनास प्रगतशील कर धोरण, किंमत धोरण, व्यापार धोरण इत्यादी विविध प्रकारच्या योजना राबवण्यासाठी उपयुक्त ठरतो.

**(३) मूल्य विरोधाभासाच्या स्पष्टीकरणासाठी उपयुक्त :** उपयोगिता मूल्य आणि विनिमय मूल्य यांतील विरोधाभास स्पष्ट करण्यासाठी हा सिद्धांत उपयुक्त ठरतो. पाण्याचा साठा मुबलक असल्यामुळे पाण्याचे उपयोगिता मूल्य जास्त असूनही विनिमय मूल्य कमी असते. परंतु हिऱ्यांचा साठा मर्यादित असल्यामुळे हिऱ्यांचे उपयोगिता मूल्य कमी असूनही विनिमय मूल्य जास्त असते.

**(४) मागणीच्या सिद्धांताचा आधार :** मागणीच्या सिद्धांतासाठी घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत आधार ठरतो. उपभोगाच्या सुरुवातीच्या स्थितीत गरजेची तीव्रता अधिक असल्यामुळे सीमांत उपयोगिता अधिक मिळते. त्यामुळे ग्राहक जास्त किंमत देऊन वस्तूची मागणी करतो. उपभोगातील सातत्यामुळे गरजेची तीव्रता कमी होते. त्यामुळे सीमांत उपयोगिता घटत जाते व त्यामुळे वस्तूच्या अधिक नगांची केवळ कमी किमतीला मागणी केली जाते.

**(३) उपयोगितेचे प्रकार स्पष्ट करा.**

**उत्तर :** उपयोगितेचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) रूप उपयोगिता :** वस्तूचे स्वरूप बदलल्यामुळे वाढलेली उपयोगिता म्हणजे रूप उपयोगिता होय. वस्तूचा रंग, रूप, आकार, बाह्य स्वरूप इत्यादींमध्ये बदल करून रूप उपयोगिता निर्माण केली जाते. **उदा.**, मातीपासून भांडी बनवणे, लाकडापासून फर्निचर बनवणे इत्यादी.

**(२) स्थल उपयोगिता :** वस्तूचे स्थलांतर करून वाढवलेली उपयोगिता म्हणजे स्थल उपयोगिता होय. वस्तूचे उत्पादनाच्या ठिकाणाहून उपभोगाच्या ठिकाणी स्थलांतर केल्यामुळे स्थल उपयोगिता निर्माण होते. **उदा.**, समुद्राकाठची वाळू बांधकामाच्या ठिकाणी आणून त्या वाळूत उपयोगिता निर्माण करणे.

**(३) सेवा उपयोगिता :** समाजातील विविध घटकांनी पुरवलेल्या सेवांमधून मिळणारी उपयोगिता म्हणजे सेवा उपयोगिता होय. **उदा.**, डॉक्टर, वकील, शिक्षक इत्यादींच्या सेवांमधून मिळणारी उपयोगिता.

**(४) ज्ञान उपयोगिता :** विशिष्ट वस्तूचे ज्ञान प्राप्त करून त्यापासून मिळणारी उपयोगिता म्हणजे ज्ञान उपयोगिता होय. **उदा.**, संगणकाच्या विविध कार्यप्रणालींचा अभ्यास केल्यामुळे संगणकाद्वारे मिळणारी उपयोगिता.

**(५) स्वामित्व उपयोगिता :** वस्तूच्या मालकी हक्कामुळे निर्माण होणारी उपयोगिता म्हणजे स्वामित्व उपयोगिता होय. **उदा.**, दुकानातील धान्याची खरेदी केल्यानंतर त्यापासून मिळणारी उपयोगिता.

**(६) काल उपयोगिता :** वस्तूच्या वापराचा काळ बदलून वाढवलेली उपयोगिता म्हणजे काल उपयोगिता होय. **उदा.**, वस्तू मुबलक प्रमाणात उपलब्ध असताना तिचा साठा करून दुर्मीळतेच्या काळात तिचा वापर करणे किंवा पावसाळ्याच्या काळात छत्र्या विक्रीस काढून त्यांमध्ये उपयोगिता निर्माण करणे.

(**नोंद :** उत्तरात कोणतेही चार मुद्दे अपेक्षित.)

**प्र. ९ पुढील विधानांशी आपण सहमत किंवा असहमत आहात ते सकारण लिहा :** ***(प्रत्येकी ४ गुण)***

**(१) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताला खऱ्या अर्थाने अपवाद नाहीत.**

**उत्तर :** या विधानाशी मी **सहमत** आहे.

**कारणे :** *यासाठी प्र.* ११ *मधील (३) चे उत्तर पाहा.*

(**नोंद :** उत्तरात कोणतेही तीन मुद्दे अपेक्षित.)

**(२) जेव्हा सीमांत उपयोगिता शून्य असते, तेव्हा एकूण उपयोगिता घटते.**

**उत्तर :** या विधानाशी मी **असहमत** आहे.

**कारणे :** (१) जेव्हा सीमांत उपयोगिता शून्य असते, तेव्हा एकूण उपयोगिता सर्वाधिक असते. ही स्थिती उपभोक्त्याच्या महत्तम समाधानाची अवस्था दर्शवते.

(२)

| वस्तूचे नग | सीमांत उपयोगिता | एकूण उपयोगिता |
|---|---|---|
| १ | ०८ | ०८ |
| २ | ०६ | १४ |
| ३ | ०४ | १८ |
| ४ | ०२ | २० |
| **५** | **००** | **२०** |
| ६ | –०२ | १८ |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, वस्तूच्या पाचव्या नगाच्या ठिकाणी सीमांत उपयोगिता शून्य आहे. या ठिकाणी एकूण उपयोगिता सर्वाधिक म्हणजे २० आहे.

(३) वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, जेव्हा सीमांत उपयोगिता शून्यापासून कमी होऊन –२ होते, तेव्हा एकूण उपयोगिता २० पासून १८ पर्यंत घटते.



NAVNEET

म्हणून जेव्हा सीमांत उपयोगिता शून्य असते, तेव्हा एकूण उपयोगिता घटत नाही तर सर्वाधिक असते.

**(३) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत व्यावहारिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे.**

**उत्तर :** या विधानाशी मी **सहमत** आहे.

**कारणे :** (१) महत्तम समाधान प्राप्त करण्याच्या दृष्टीने उपलब्ध साधनसामग्रीचा कशा प्रकारे वापर करावा, याची आखणी करण्यासाठी उपभोक्त्याला घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उपयुक्त ठरतो.

(२) शासनास प्रगतिशील करप्रणालीची आखणी करताना किंमत धोरण किंवा व्यापार धोरण ठरवताना घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उपयुक्त ठरतो.

(३) मूल्य विरोधाभासाच्या स्पष्टीकरणासाठी तसेच मागणीच्या नियमाचा आधार म्हणून घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उपयुक्त ठरतो.

म्हणून घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत व्यावहारिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे.

**(४) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत अनेक गृहीतकांवर आधारित आहे.**

**उत्तर :** या विधानाशी मी **सहमत** आहे.

**कारणे :** *यासाठी प्र. ११ मधील (२) चे उत्तर पाहा.*

(**नोंद :** उत्तरात कोणतेही तीन मुद्दे अपेक्षित.)

**(५) सीमांत उपयोगिता आणि एकूण उपयोगिता यांच्यात काहीच संबंध नाही.**

**उत्तर :** या विधानाशी मी **असहमत** आहे.

**कारणे :** *यासाठी प्र. ८ मधील (१) चे उत्तर पाहा.*

*** प्र. १० पुढील तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा :**
***(प्रत्येकी ४ गुण)***


| वस्तूचे नग | एकूण उपयोगिता | सीमांत उपयोगिता |
|---|---|---|
| १ | ६ | ६ |
| २ | ११ | ५ |
| ३ | १५ | ४ |
| ४ | १५ | ० |
| ५ | १४ | –१ |

**(१)** एकूण उपयोगिता व सीमांत उपयोगिता वक्र काढा.

**(२)** (अ) जेव्हा एकूण उपयोगिता महत्तम असते, तेव्हा सीमांत उपयोगिता ______.

(ब) जेव्हा एकूण उपयोगिता घटते, तेव्हा सीमांत उपयोगिता ______.

**उत्तरे : (१)**




**(२)** (अ) जेव्हा एकूण उपयोगिता महत्तम असते, तेव्हा सीमांत उपयोगिता शून्य असते.

(ब) जेव्हा एकूण उपयोगिता घटते, तेव्हा सीमांत उपयोगिता ऋण होते.

**प्र. ११ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**
***(प्रत्येकी ८ गुण)***

**(१) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उदाहरण व आकृतीसह स्पष्ट करा.** ***किंवा***

**घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.**

**उत्तर :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतो :

(१) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत सर्वप्रथम प्रा. गॉसेन यांनी मांडला. परंतु त्यानंतर प्रा. आल्फ्रेड मार्शल यांनी १८९० साली आपल्या 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' या ग्रंथात हा सिद्धांत विस्तृत स्वरूपात सादर केला.


(२) **सिद्धांताचे विधान :** प्रा. आल्फ्रेड मार्शल यांच्या मते, "इतर परिस्थिती कायम असताना मनुष्याजवळ आधीपासून असलेल्या एखाद्या वस्तूच्या साठ्यात वाढ होत गेल्यास त्यापासून मिळणारे अतिरिक्त समाधान, त्या वस्तूच्या साठ्यात होणाऱ्या वाढीबरोबर क्रमशः घटत जाते."

(३) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत पुढील कोष्टकाच्या आधारे स्पष्ट करता येतो :

| वस्तूचे नग | सीमांत उपयोगिता |
|---|---|
| १ | ८ |
| २ | ६ |
| ३ | ४ |
| ४ | २ |
| ५ | ० |
| ६ | –२ |

(४) वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, वस्तूचा साठा १ ते ६ नगसंख्या याप्रमाणे वाढत गेल्यास सीमांत उपयोगिता ८ पासून – २ पर्यंत क्रमशः घटत जाते.

(५) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत पुढील आकृतीच्या आधारे स्पष्ट करता येतो :




(६) वरील आकृतीत 'क्ष' अक्षावर वस्तूचे नग आणि 'य' अक्षावर उपयोगितेचे एकक दर्शवले आहे. वरील आकृतीतून असे दिसून येते की, वस्तूच्या पहिल्या नगापासून उपभोक्त्याला सर्वांत जास्त उपयोगिता मिळते. उपभोक्ता जसजसा वस्तूच्या पुढील नगांचे एकामागोमाग सेवन करतो, तेव्हा सीमांत उपयोगिता क्रमशः घटत जाते.

(७) वस्तूच्या पाचव्या नगाच्या ठिकाणी सीमांत उपयोगिता शून्य होते. त्यामुळे वस्तूच्या पाचव्या नगाच्या ठिकाणी सीमांत उपयोगिता वक्र 'क्ष' अक्षाला स्पर्श करतो. हा बिंदू सर्वाधिक समाधानाची पातळी दर्शवतो. या बिंदूला सर्वाधिक समाधानाचा बिंदू असे म्हणतात.

(८) वस्तूच्या सहाव्या नगाच्या सेवनाने उपभोक्त्याला असमाधान, म्हणजेच ऋण उपयोगिता मिळते. थोडक्यात असे सिद्ध होते की, वस्तूच्या उपभोगात निरंतर वाढ झाल्यास सीमांत उपयोगिता घटत जाते. त्यामुळे घटत्या सीमांत उपयोगितेचा वक्र डावीकडून उजवीकडे वरून खाली सरकतो.

**(२) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताची गृहीतके स्पष्ट करा.**

**उत्तर :** घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताची गृहीतके पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) विवेकशीलता :** उपभोक्त्याची वर्तणूक सर्वसामान्य आहे व महत्तम समाधान प्राप्त करणे हा त्याचा उद्देश आहे, असे सिद्धांत गृहीत धरतो.

**(२) संख्यात्मक मापन :** उपयोगिता अंकामध्ये मोजता येते असे सिद्धांत गृहीत धरतो. म्हणजेच उपयोगिता अंकांमध्ये मोजता येते व उपयोगितेची तुलना करता येते, असे गृहीत धरले जाते.

**(३) एकजिनसीपणा :** उपभोक्ता सेवन करीत असलेल्या वस्तूंचे सर्व नग एकजिनसी आहेत, असे सिद्धांत गृहीत धरतो. म्हणजेच वस्तूचे सर्व नग रंग, रूप, आकार, चव, गुणवत्ता इत्यादी बाबतींत तंतोतंत एकसारखे आहेत.

**(४) उपभोग सातत्य :** वस्तूच्या विविध नगांच्या सेवनात निरंतरता (सातत्य) आहे, असे सिद्धांत गृहीत धरतो.

**(५) योग्य आकारमान :** उपभोग्य वस्तूचा आकार फार मोठा किंवा लहान नसून मध्यम (सर्वसाधारण) आहे असे सिद्धांत गृहीत धरतो.

**(६) स्थिरता :** उपभोगाच्या कालावधीत उपभोक्त्याची उत्पन्न-पातळी, आवड, पसंती व वस्तूची किंमत इत्यादी घटक स्थिर असल्याचे सिद्धांत गृहीत धरतो. तसेच पैशाच्या प्रत्येक एककाची उपयोगिता स्थिर असल्याचे गृहीत धरले जाते.

**(७) विभाज्यता :** उपभोक्त्याने उपभोगात आणलेली वस्तू विभाज्य आहे.

**(८) एकच गरज :** वस्तूचा दुसऱ्या कोणत्याही गरजा भागवण्यासाठी वापर केला न जाता केवळ उपभोगासाठी वापर केला जातो, असे सिद्धांत गृहीत धरतो.

**(९) पैशातील उत्पन्नाची सीमांत उपयोगिता स्थिर :** उपभोक्त्याच्या शिल्लक राहिलेल्या पैशांतील उत्पन्नाची सीमांत उपयोगिता स्थिर आहे.

**(३) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताचे अपवाद स्पष्ट करा.**

**उत्तर :** घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताला खऱ्या अर्थाने कोणतेही अपवाद नाहीत. या सिद्धांतास पुढील काही अपवाद हे केवळ बोलण्यापुरते आहेत :

**(१) छंद :** दुर्मीळ तिकिटे, नाणी, चित्रे इत्यादींचा संग्रह करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्याजवळील दुर्मीळ वस्तूंच्या साठ्यात वाढ झाल्यास; त्याचप्रमाणे संगीतशौकीन व्यक्तींना अधिकाधिक संगीत ऐकल्याने किंवा वाचनप्रिय व्यक्तींना अधिकाधिक वाचन केल्यामुळे अधिकाधिक उपयोगिता मिळते, असे म्हटले जाते. परंतु सिद्धांताच्या एकजिनसीपणाच्या गृहीतकानुसार अशा व्यक्तींना एकाच प्रकारच्या तिकिटांचा किंवा नाण्यांचा संग्रह करण्यास सांगितले असता किंवा एकच संगीत ऐकण्यास किंवा एकच पुस्तक वाचण्यास दिले असता सीमांत उपयोगिता घटते. म्हणजेच छंद खऱ्या अर्थाने सिद्धांतास अपवाद ठरत नाही.

**(२) कंजूष व्यक्ती :** कंजूष व्यक्तीला अधिकाधिक पैशापासून अधिकाधिक उपयोगिता मिळते, असे म्हटले जाते. परंतु कंजूष व्यक्तीचे वर्तन हे विवेकी नसते. म्हणून कंजूष व्यक्ती खऱ्या अर्थाने सिद्धांतास अपवाद ठरत नाही.

**(३) अमली पदार्थांचे व्यसन :** मद्यपी व्यक्तीला मद्याच्या अधिकाधिक सेवनातून अधिकाधिक उपयोगिता मिळते, असे म्हटले जाते. परंतु सिद्धांताच्या गृहीतकाप्रमाणे मद्यपी व्यक्तीचे वर्तन हे विवेकी असत नाही. म्हणून मद्यपी व्यक्ती खऱ्या अर्थाने सिद्धांतास अपवाद ठरत नाही.

**(४) सत्ता :** अधिकाधिक सत्ता मिळवण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीस अधिकाधिक सत्तेपासून अधिकाधिक उपयोगिता मिळते, असे म्हटले जाते. परंतु सिद्धांताच्या गृहीतकाप्रमाणे सत्तेची लालसा असणाऱ्या व्यक्तीचे वर्तन हे विवेकी असत नाही. म्हणून सत्ता खऱ्या अर्थाने सिद्धांतास अपवाद ठरत नाही.

**(५) पैसा :** अधिकाधिक पैशापासून अधिकाधिक उपयोगिता मिळत जाते असे म्हटले जाते. परंतु प्रत्यक्षात पैशाचा साठा वाढला असता पैशाची सीमांत उपयोगिताही कमी होत जाते. **उदा.,** अत्यंत दरिद्री व्यक्तीस १० रुपयांमध्ये जास्त उपयोगिता सापडते, परंतु कोट्यधीश व्यक्तीला १० रुपयांमध्ये कमी उपयोगिता सापडते. म्हणजेच पैसाही या सिद्धांतास खऱ्या अर्थाने अपवाद ठरत नाही.

***(४) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत अपवादांसह स्पष्ट करा.**

**उत्तर : (अ) सिद्धांत :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतो :

(१) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत सर्वप्रथम प्रा. गॉसेन यांनी मांडला. परंतु त्यानंतर प्रा. आल्फ्रेड मार्शल यांनी १८९० साली आपल्या 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' या ग्रंथात हा सिद्धांत विस्तृत स्वरूपात सादर केला.

(२) **सिद्धांताचे विधान :** प्रा. आल्फ्रेड मार्शल यांच्या मते, ''इतर परिस्थिती कायम असताना मनुष्याजवळ आधीपासून असलेल्या एखाद्या वस्तूच्या साठ्यात वाढ होत गेल्यास त्यापासून मिळणारे अतिरिक्त समाधान, त्या वस्तूच्या साठ्यात होणाऱ्या वाढीबरोबर क्रमशः घटत जाते.''

**(ब) अपवाद :** *यासाठी याच प्रश्नप्रकारातील (३) चे उत्तर पाहा.*

**(५) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत व त्याच्या मर्यादा स्पष्ट करा.**

**उत्तर : (अ) सिद्धांत :** *यासाठी याच प्रश्नप्रकारातील प्रश्न (४) (अ) पाहा.*

**(ब) सिद्धांताच्या मर्यादा :** घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतास पुढील मर्यादा आहेत :

**(१) अवास्तव गृहीतके :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत हा वस्तूच्या नगांचा एकजिनसीपणा, उपभोग सातत्य, पैशाच्या उपयोगितेत स्थिरता, उपभोक्त्याचे विवेकपूर्ण वर्तन इत्यादी अवास्तव गृहीतकांवर आधारलेला आहे.

**(२) संख्यात्मक मापन :** उपयोगितेचे संख्यात्मक मापन व तुलनात्मक विवेचन करणे शक्य असते असे सिद्धांत गृहीत धरतो. परंतु प्रत्यक्षात उपयोगितेचे संख्येत मोजमाप करणे शक्य नसते.

**(३) अविभाज्य वस्तू :** घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत दूरदर्शन संच, गाडी, घर अशा अविभाज्य वस्तूंसाठी लागू पडत नाही.

**(४) पैशाची स्थिर सीमांत उपयोगिता :** पैशाच्या प्रत्येक एककाची सीमांत उपयोगिता स्थिर राहते असे सिद्धांत गृहीत धरतो. परंतु प्रत्यक्षात पैशाची सीमांत उपयोगिता स्थिर राहत नाही.

**(५) एकच गरज :** हा सिद्धांत केवळ विशिष्ट वेळी एकाच वस्तूच्या उपभोगातून मिळणाऱ्या समाधानापुरता मर्यादित आहे. परंतु प्रत्यक्षात मनुष्य एकाच वेळी अनेक गरजा पूर्ण करून समाधान मिळवण्याचा प्रयत्न करीत असतो.

**(६) सीमांत उपयोगिता आणि किंमत यांतील संबंध स्पष्ट करा.**

**उत्तर :** मागणीचा सिद्धांत घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतावर आधारित आहे. मागणीच्या नियमाचे स्पष्टीकरण देण्यासाठी सर्वप्रथम सीमांत उपयोगिता आणि किंमत यांतील संबंध जाणून घेणे आवश्यक असते. सीमांत उपयोगिता व किंमत यांतील संबंध जाणून घेण्यासाठी सर्वप्रथम सीमांत उपयोगितेला पैशाच्या स्वरूपात व्यक्त करणे आवश्यक ठरते. त्यासाठी सीमांत उपयोगितेच्या विशिष्ट परिमाणासाठी पैशात मूल्य गृहीत धरणे आवश्यक ठरते. **उदा.,** १ नग = ₹ १० आणि सीमांत उपयोगिता ₹ मध्ये = सी. उ. × ₹ १०. सीमांत उपयोगिता आणि किंमत यांतील संबंध पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट करता येतो :

| 'क्ष' या वस्तूचे नग | 'क्ष' या वस्तूच्या नगापासून मिळणारी सीमांत उपयोगिता | सीमांत उपयोगिता (₹ मध्ये) १ नग = ₹ १० सी. उ. × ₹ १० | बाजार किंमत/ घटक नग किंमत (₹ ५०) | सीमांत उपयोगिता आणि किमतीची तुलना |
|---|---|---|---|---|
| १ | १० | १००(१०×₹ १०) | ५० | १०० सी.उ.>₹ ५० |
| २ | ८ | ८० (८×₹ १०) | ५० | ८० सी.उ.>₹ ५० |
| ३ | ७ | ७० (७×₹ १०) | ५० | ७० सी.उ.>₹ ५० |
| ४ | ५ | ५० (५×₹ १०) | ५० | ५० सी.उ.=₹ ५० |
| ५ | ३ | ३० (३×₹ १०) | ५० | ३० सी.उ.<₹ ५० |
| ६ | १ | १० (१×₹ १०) | ५० | १० सी.उ.<₹ ५० |

(१) वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, उपभोगाच्या सुरुवातीच्या स्थितीत (नग १, २ व ३) गरजेची तीव्रता अधिक असल्यामुळे (पहिल्या तीन नगांपासून) पैशातील सीमांत उपयोगिता किमतीपेक्षा अधिक असते. या सर्व नगांची विवेकी उपभोक्त्याकडून मागणी केली जाते.

(२) ज्या नगांपासून मिळणारी पैशातील सीमांत उपयोगिता ही त्या नगांच्या किमतीपेक्षा अधिक असते, अशा नगांना सीमांतपूर्व नग म्हणतात. सीमांतपूर्व नगांच्या बाबतीत **सी.उ. > किं.** ही स्थिती आढळते.

(३) उपभोगाच्या सातत्याने एका विशिष्ट स्थितीला (नग ४) पैशातील सीमांत उपयोगिता व किंमत समसमान होते. या ठिकाणी विवेकी उपभोक्ता संबंधित वस्तूच्या नगाची मागणी थांबवतो. ही विवेकी उपभोक्त्याची समतोलाची अवस्था असते.

(४) ज्या नगापासून मिळणारी पैशातील सीमांत उपयोगिता ही त्या नगाच्या किमतीएवढीच असते, अशा नगाला सीमांत नग म्हणतात. सीमांत नगाच्या बाबतीत **सी. उ. = किं.** ही स्थिती आढळते.

(५) समतोलाच्या अवस्थेनंतर उपभोग चालूच ठेवला असता (नग ५ व ६) वस्तूची गरज संपल्यामुळे (पाचव्या व सहाव्या नगापासून) पैशातील सीमांत उपयोगिता किमतीपेक्षा कमी असते. विवेकी उपभोक्ता या नगांची मागणी करीत नाही.

(६) ज्या नगांपासून मिळणारी पैशातील सीमांत उपयोगिता ही त्या नगांच्या किमतीपेक्षा कमी असते, अशा नगांना सीमांतोत्तर नग म्हणतात. सीमांतोत्तर नगांच्या बाबतीत **सी.उ. < किं.** ही स्थिती आढळते.

(७) वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, वस्तूच्या विविध नगांचे लागोपाठ सेवन केले असता, सीमांत उपयोगिता क्रमशः घटत जाते. त्यामुळेच वस्तूच्या सुरुवातीच्या नगांची तुलनेने जास्त किमतीला, तर पुढील नगांची केवळ कमी किमतीलाच मागणी केली जाते.

(८) अशा प्रकारे, सीमांत उपयोगिता व किंमत यांतील संबंध हा मागणीच्या सिद्धांताचा पाया ठरतो.

**(७) उपयोगितेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर :** उपयोगितेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) सापेक्ष संकल्पना :** उपयोगिता स्थळानुसार आणि काळानुसार बदलते. **उदा.,** लोकरीच्या उबदार कपड्यांत मुंबईत कमी उपयोगिता आणि काश्मीरमध्ये जास्त उपयोगिता असते. तसेच लोकरीच्या कपड्यांत उन्हाळ्यात कमी उपयोगिता आणि हिवाळ्यात जास्त उपयोगिता आढळते.

**(२) व्यक्तिनिष्ठ संकल्पना :** उपयोगिता व्यक्तीनुसार बदलत जाते. व्यक्तीचे वय, लिंग, शिक्षण, आवडीनिवडी यांनुसार उपयोगिता बदलत जाते. **उदा.,** निरक्षर व्यक्तीला एखाद्या पुस्तकातून कमी उपयोगिता सापडते, परंतु साक्षर व्यक्तीला त्याच पुस्तकातून जास्त उपयोगिता मिळते.

**(३) नैतिकदृष्ट्या तटस्थ :** अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून मानवी गरज पूर्ण करणाऱ्या दारूसारख्या अपायकारक आणि दुधासारख्या उपकारक अशा दोन्ही वस्तूंमध्ये उपयोगिता असते. म्हणजेच उपयोगितेच्या संकल्पनेत योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, उपकारक-अपायकारक, नैतिक-अनैतिक इत्यादी बाबींचा विचार केला जात नाही. म्हणून उपयोगिता नैतिकदृष्ट्या तटस्थ असते.

**(४) उपयोगिता व उपयुक्तता यांत फरक :** उपयोगिता आणि उपयुक्तता या पूर्णतः भिन्न संकल्पना आहेत. वस्तूत उपयोगिता असूनही तिच्यात उपयुक्तता असेलच असे नाही. **उदा.,** दारू, सिगरेट यांसारख्या शरीरास हानिकारक पदार्थांमध्ये केवळ उपयोगिता असते, उपयुक्तता असत नाही.

**(५) उपयोगिता व आनंद यांत फरक :** एखाद्या वस्तूत उपयोगिता असूनही त्या वस्तूच्या सेवनाने आनंद मिळतोच असे नाही. **उदा.,** कडू औषधांमध्ये उपयोगिता असूनही त्यांच्या सेवनाने आनंद, समाधान मिळत नाही. म्हणून उपयोगिता आणि आनंद या वेगवेगळ्या संकल्पना आहेत.

**(६) उपयोगिता व समाधान यांत फरक :** उपयोगिता आणि समाधान या पूर्णतः भिन्न संकल्पना आहेत. उपयोगिता वस्तूशी संबंधित असते, तर समाधान हे उपभोग करणाऱ्या व्यक्तीशी संबंधित असते. उपयोगिता हे अपेक्षित समाधान असते व समाधान ही प्रत्यक्ष अनुभूती असते. उपयोगिता उपभोगाची सुरुवात असते, तर समाधान हा उपभोगाचा अंतिम परिणाम असतो.

**(७) केवळ तात्त्विक मापन शक्य :** उपयोगिता ही व्यक्तिनिष्ठ संकल्पना असून ती समाधानाच्या भावनेशी निगडित आहे. उपयोगितेला सुनिश्चित स्वरूपाचे अस्तित्व नाही. ती अदृश्य व अमूर्त संकल्पना आहे. म्हणून उपयोगिता ही मानसशास्त्रीय संकल्पना आहे. त्यामुळेच उपयोगितेचे केवळ तात्त्विक मापन शक्य असते, परंतु संख्यात्मक मापन शक्य नसते.

**(८) बहुपर्यायी :** एकाच वस्तूद्वारे एकाहून अधिक व्यक्तींच्या निरनिराळ्या गरजा भागू शकतात. त्यामुळे उपयोगिता बहुपर्यायी आहे. **उदा.,** एखादी व्यक्ती विजेचा वापर धुलाई यंत्र चालवण्यासाठी करते, तर दुसरी व्यक्ती विजेचा वापर वातानुकूलित यंत्र चालवण्यासाठी करते.

**(९) गरजेच्या तीव्रतेवर अवलंबून असते :** उपयोगिता वस्तूच्या गरजेच्या तीव्रतेवर अवलंबून असते. वस्तूच्या पहिल्या नगाच्या वेळी व्यक्तीची त्या वस्तूची गरज अधिक तीव्र असते. त्यामुळे पहिल्या नगापासून सर्वाधिक उपयोगिता मिळते. परंतु जसजसा वस्तूचा साठा वाढत जातो, तसतशी व्यक्तीची त्या वस्तूबाबतची गरज कमी तीव्र होत जाते. म्हणून वस्तूचा साठा वाढत गेल्यास सीमांत उपयोगिता घटत जाते.

**(१०) मागणीचा आधार :** उपयोगिता मागणीचा आधार आहे. एखाद्या वस्तूत उपयोगिता नसेल, तर विवेकी उपभोक्ता अशा वस्तूची मागणी करीत नाही. परंतु एखाद्या वस्तूत उपयोगिता असेल, तर गरजेच्या महत्तम समाधानासाठी उपभोक्ता अशा वस्तूची मागणी करतो. अशा प्रकारे हा सिद्धांत मागणीच्या नियमाला आधार ठरतो.

(**नोंद :** उत्तरात कोणतेही आठ मुद्दे अपेक्षित.)

NAVNEET

## Based on the New Textbooks STANDARD XII

### Languages (Arts, Science, Commerce) :

1. English Yuvakbharati Digest (English Edition)
2. English Yuvakbharati Digest (मराठी आवृत्ती)
3. मराठी युवकभारती नवनीत
4. हिंदी युवकभारती नवनीत
5. Navneet English Yuvakbharati Grammar
6. English Writing Skills & Oral Test
7. नवनीत मराठी युवकभारती निबंध व लेखन
8. नवनीत मराठी युवकभारती व्याकरण
9. नवनीत हिंदी युवकभारती निबंध और लेखन

### Science :

1. **Physics** : (i) Physics Digest (Parts I & II) (ii) Handbook of Physics Practicals
2. **Chemistry** : (i) Chemistry Digest (Parts I & II)
   (ii) Handbook of Chemistry Practicals
   (iii) Navneet Organic Chemistry Reactions
   (iv) Navneet Physical Chemistry
3. **Biology** : (i) Biology Digest (Parts I & II) (ii) Handbook of Biology Practicals
4. **Mathematics & Statistics Digest, Part I** (For Science & Arts)
5. **Mathematics & Statistics Digest, Part II** (For Science & Arts)
6. Golden Book of Log Tables
7. Navneet Log Tables

### Arts & Commerce (English Medium) :

1. Economics Digest
2. Organisation of Commerce Digest
3. Secretarial Practice Digest
4. Book-keeping & Accountancy Digest
5. Mathematics & Statistics Digest, Part I (For Commerce)
6. Mathematics & Statistics Digest, Part II (For Commerce)

### कला आणि वाणिज्य (मराठी माध्यम) :

1. अर्थशास्त्र नवनीत
2. वाणिज्य संघटन व व्यवस्थापन नवनीत
3. चिटणिसाची कार्यपद्धती नवनीत
4. सहकार नवनीत
5. भूगोल नवनीत
6. इतिहास नवनीत
7. राज्यशास्त्र नवनीत
8. मानसशास्त्र नवनीत
9. समाजशास्त्र नवनीत
10. शिक्षणशास्त्र नवनीत

### Model Question Papers :

1. For Commerce
2. For Science

### Environment Education :

1. Navneet Environment Education – Projects & Assignments Book
2. नवनीत पर्यावरण शिक्षण – प्रकल्प व जर्नल

### Geography :

1. Geography Practical Examination Journal
2. भूगोल प्रात्यक्षिक परीक्षा जर्नल

**These books are available from all booksellers**

NAVNEET® NAVNEET EDUCATION LIMITED MW12e

Like us on /navneet.india | www.navneet.com